# गहिवर

रमेश सावंत

• गहिवर •

• रमेश सावंत •

## रमेश नागेश सावंत

**जन्म** : वेंगुर्ला येथे १९५४ साली

**मूळ गांव** : देवसु ,ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग

**शिक्षण** :
- एम.ए.(हिंदी), मुंबई विद्यापीठ
- एम. ए.(मराठी) द्वितीय वर्ष,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
- केन्द्रीय अनुवाद ब्यूरो,भारत सरकारची अनुवाद अभ्यासक्रम प्रमाणपत्र परीक्षा

**अनुभव** :
- मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमधून विविध अनुवादाचा दीर्घ अनुभव
- बँक ऑफ इंडियातून २० वर्षाच्या सेवेनंतर १९९७ साली स्वेच्छानिवृत्त
- सेन्टॉर हॉटेलच्या मुख्य कार्यालयात १९९७ ते २००३ पर्यंत उप-व्यवस्थापक (राजभाषा)

**पुरस्कार** :
- आंतर-बँक हिंदी व मराठी काव्य, निबंध, वक्तृत्त्व, वादविवाद इत्यादी स्पर्धांमधे अनेक पुरस्कार
- मराठीतून हिंदीत अनुवादित 'शेवंता जिंदा है' या नाटकास राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत द्वितीय पुरस्कार
- गेल्या दोन वर्षांत ७ राज्यस्तरीय काव्यस्पर्धांमध्ये पुरस्कार

**प्रकाशित साहित्य** :
- विविध दैनिके, साप्ताहिके, विशेषांक व दिवाळी अंकांमधून कविता प्रकाशित
- 'अस्वस्थ काळजावरचं मोरपिस' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहात कविता प्रकाशित

**आगामी प्रकाशन** : 'ती चिनारची झाडे' ('वे चिनार के पेड ' या हिन्दी काव्यसंग्रहाचा मराठी भावानुवाद)

**संपर्क :**

पत्ता - बी -२४, केंद्र सरकारी कर्मचारी वसाहत, वडाळा पश्चिम,मुंबई -४०००३१.

ईमेल - rameshns12@gmail.com

भ्रमणध्वनी - ९८२१२ ६२७६७

# गहिवर

रमेश सावंत

प्रस्तावना - बाळ राणे

स्मित प्रकाशन

e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

GAHIVAR
(MARATHI : POETRY)

RAMESH SAWANT

**गहिवर**
(कविता संग्रह)

प्रथम आवृत्ती : नोव्हेंबर २०१२

© **रमेश नागेश सावंत**
बी -२४, केंद्र सरकारी कर्मचारी वसाहत,
वडाळा पश्चिम, मुंबई -४०० ०३१.
भ्रमणध्वनी - ९८२११२६२७६७
इमेल : rameshns12@gmail.com

**प्रकाशक :**
रॉकी लोपिस
स्मित प्रकाशन
'प्राक्तन' माणिकपूर पीठा
वसई रोड ४०१ २०२
भ्रमणध्वनी - ९३२६३ ८०७१७
दूरध्वनी -०२५०-२३८०७१७

**मुखपृष्ठ** : कमल शेडगे

**अक्षरजुळणी व सजावट** : इंडिया प्रिंटिंग वर्क्स

**मुद्रक :**
आनंद लिमये
इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा,
मुंबई - ४०० ०३१.

**मूल्य** : १२० रुपये

e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

हजार डोळ्यांमधले पाणी
माझ्या डोळ्यांमध्ये जमते...
हजार हृदये गहिवरतीं तर
मन माझेही गहिंवरते
असे हजारांसंगे आहे
जडलेले माझे नाते

**- कविश्रेष्ठ कुसुमाग्रज**

e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## ऋण गहिवर

बाळ राणे सर
बाळ सावंत सर
रॉकी लोपिस, स्मित प्रकाशन, वसई
कमल शेडगे
आनंद लिमये, इंडिया प्रिंटिंग वर्क्स
विलास गुर्जर
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
कोकण मराठी साहित्य परिषद
प्रकाश जाधव, एकता कल्चरल अकादमी
विवेक चितळे, बुकगंगा, पुणे
भारती सरमळकर, ईसाहित्य प्रतिष्ठान
कवी नारायण सुमंत
शाहीर जयंत जाधव, शेतकरी साहित्य परिषद (इर्जिक), आटपाडी
मैत्रेयी फाऊंडेशन, मुंबई
कवितांगण, गोरेगांव
आचार्य अत्रे कट्टा, कांदिवली
अण्णासाहेब कुळये
मनोहर पांचाळ, संपादक-अधिष्ठान
अक्षरधन त्रैमासिक
चैत्राली, कलामंच, दरवळ आणि अनामिक दिवाळी अंक
रेश्मा सावंत
प्रथमेश सावंत
सावंत व मोडक परिवारजन
देवसु ग्रामस्थ मंडळ, मुंबई व देवसु
बँक ऑफ इंडिया मित्र परिवार
समस्त मित्रवर्ग, शिक्षकवर्ग
विद्या अचारी
आणि
सर्व कविताप्रेमी रसिक

e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

माझ्या बालपणी मला आपल्या पाठीवर घेऊन
गावोगावी फिरविणारे माझे प्रेमळ आजोबा
**कै. विश्राम कृष्णा सावंत उर्फ ताता**

व

जिच्यासह तालुक्याच्या बाजाराचा मैलोगणिक रस्ता
उन्हातान्हातून अनवाणी पायांनी तुडवला होता
ती माझी वत्सल आजी
**कै. रमाबाई विश्राम सावंत**

आणि

स्वावलंबन व जिद्दीने जगण्याचा मंत्र देणारे
माझे पिताश्री
**कै. नागेश विश्राम सावंत** -
(निधन -५ मार्च २०१२)

या सर्वांच्या पवित्र स्मृतींना आदरपूर्वक

e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# गहिवर



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# जीवनानुभूती आणि कल्पनाशक्ती यांचा मिलाफ असलेल्या कविता

'गहिवरल्या भावांतून
खुलते नव गीत मधुर
शांतवल्या सूरांतून
बहर नाद भानावर'

अशा शब्दांतून 'गीत गहिवर', 'प्रेम गहिवर', 'श्रावण गहिवर', 'गझल गहिवर', 'मुक्त गहिवर' या पाच विभागांतील समृद्ध कवितांनी बहरलेल्या 'गहिवर'या पहिल्याच काव्यसंग्रहाच्या रूपानं मराठी काव्यविश्वात स्वत:च्या आगमनाचा पुकारा करणारा रमेश सावंत हा माझा विद्यार्थी आहे आणि त्याच्या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहिताना मला खरोखर अतिशय आनंद होत आहे. रमेश हा नवोदित कवी असला तरी त्याच्या कविता प्रथितयश आहेत, याचाही मी आवर्जून उल्लेख करतो. आठवीपासूनच तो कविता लिहित होता. त्याचवेळी तो भविष्यकाळात एक चांगला कवी होईल, असे मी त्याला आशीर्वाद दिले होते. तथापि, महाविद्यालयीन शिक्षण आणि कौटुंबिक समस्या यामुळे त्याचं काव्यलेखन खंडित झालं आणि त्याचा माझ्याशी संपर्क तुटला. आश्चर्य म्हणजे, जवळ जवळ साठीच्या उंबरठ्यावर असताना दोन महिन्यापूर्वी तो माझ्या घरी आला तो स्वत:च्या काव्यसंग्रहाचं हस्तलिखित घेऊन, त्याला प्रस्तावना लिहिण्यासाठी!

प्रदीर्घ कालावधीनंतर लिहिलेल्या या कविता वाचताना मला प्रसिद्ध इंग्लिश कवयित्री एमिली लोवेल यांनी व्यक्त केलेले विचार आठवले. त्या लिहितात, 'कवीचं बोधपूर्व मन किती काळजीपूर्वक व काटकसरीनं कार्य करतं याचा मला अनुभव आहे. एखादी कल्पना माझ्या मनात सहजपणे येऊन जाते. ही कल्पना चांगली आहे, असं मी ठरवते. हे ठरवल्यानंतर मी त्यावर



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

फारसा विचार करत नाही. पोस्टाच्या पेटीत पत्र टाकावं तशी ती कल्पना माझ्या बोधपूर्व मनात टाकून देते. सहा एक महिन्यांनी माझ्या मनात शब्द येऊ लागतात. माझा खाजगी वाक्यप्रयोग करुन बोलायचं झाल्यास तिथं कविता असते. 'रमेशच्या बाबतीत असंच काहीसं घडलं असावं, त्याचा मूलभूत पिंड कवीचा असल्यामुळे. एखादी कल्पना मनात आल्यानंतर त्यानं त्याचा संचय बोधपूर्व मनात केला असेल आणि योग्य वेळी त्या शब्दरूपात साकार झाल्या. त्याच या कविता. मला असं वाटतं, याचं उत्तर त्याच्याच एका कवितेत मला आढळलं -

आयुष्याची पानं अलगद उलगडताना
अवचितच कधी गोठलेले क्षण विरघळू लागतात
आणि आपल्या क्षुब्ध डोळ्यांमधून
उसळून येतात, विचारांचे तप्त ज्वालामुखी (वास्तव आयुष्याचे)

आयुष्याच्या संक्रमण काळातील हा उदासपणा त्याच्या काही कवितांतून प्रकर्षानं जाणवतो. उजेडवाटा फुलल्या तरीही हा अंधारयात्री कसोशीनं पेललेलं आपलं गळकं आभाळ डोक्यावर घेऊन जीवनाच्या काटेरी वळणांच्या पायवाटेवरुन अख्ख्या जगाचा पसारा तुडवत चाललेला असतो. हिरव्या जाळीत चंद्र मात्र अंधारात बुडणाऱ्या आभाळात रडत राहतो.

निरर्थकाचे पक्षी जेव्हा भरारी घेतात तेव्हा त्यांच्या अस्तित्वाला अर्थच उरत नाही. असं अर्थावाचून जगणं त्याला जाळत राहतं, पण ते त्याच्या दु:खाच्या ज्वाळांत विरघळत राहतं. मात्र, तोपर्यंत तो आपल्या 'अनंत यातना अनवरतपणे भोगत राहतो.' (अस्तित्वाचा शोध)

मात्र दु:खाचा आलेख रेखाटताना 'मी'असा उल्लेख कवीच्या काही कवितांमध्ये आला असला तरीही त्यामुळे हे दु:ख फक्त स्वत:पुरतंच मर्यादित न राहता सभोवतालच्या समाजाकडे, माणसांकडे डोळसपणे पाहणारं आहे, याची प्रचिती अनेक कवितांतून येते. उदाहरणार्थ -

जगत जगत जळणं म्हणजे जगणं नव्हे
ती तर नुसती जगण्याची पराकोटीची धडपड


e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

आणि दु:खांच्या फोलपटांत आपलं मरण शोधत फिरणं असतं
(आंधळी कोशिंबीर)

यामुळेच केवडा कितीही सुगंधी असला तरी त्याची धार गळा कापायला पुरेशी असते याची त्याला जाणीव आहे. 'इथल्या काळ्या मातीच्या गंधात ज्याचा घाम वितळून गेलाय, ज्यानं कित्येक दिवसांची भूक आपल्या खपाटीला लागलेल्या पोटात साठवून ठेवली आहे, अशा शेतकऱ्याची व्यथा, तडफड आणि आत्महत्या यावर रोखठोक प्रकाशझोत टाकणारी 'मातीतला माणूस' ही कविता तर अप्रतिम उतरली आहे. 'तो जगतो आहे 'या कवितेत विटक्या डोळ्यांच्या कॅमेऱ्यातून जगाकडे पाहणाऱ्या आजच्या तरुणाची व्यथा साकार करताना झिजलेल्या चपलांना पायांतून ओढत चालताना रस्ते गहिवरुन जातात, चणेवालाही त्याच्या अंगावर थुंकतो आणि तो स्वत:च नवा चणेवाला होऊन कसा जगत राहतो, याचं भीषण वास्तव शब्दबद्ध केलेलं आहे. 'विरक्त' या कवितेत स्वत:चं स्वत:च्याच अंगावर विखुरलेलं वर्तमान तो आरपार पाहत राहतो. विरक्तपणे जगताना तो कितीही विटला तरी त्याची आत्ममग्न पावलं काळावर मात करून 'मेंदूतल्या विचारगर्भ उल्कांची रेखीव नक्षी संचिताच्या आभाळावर कोरण्यासाठी' पुढे पुढे पडतच राहतात. रमेशच्या 'मुक्त गहिवर' मधल्या बहुतेक सर्व कविता मला अतिशय भावल्या आहेत.

वेलके व वारन हे समीक्षक म्हणतात, 'कविता म्हणजे विवक्षित अनुभव अथवा अनेक अनुभवांची बेरीज नसते. ती अनुभवाचं सूक्ष्म शक्तिशाली कारण (Poetical cause of experiences) असते. आपण ज्याला जीवन म्हणू शकतो, असं काहीतरी तिच्यात असतं या दृष्टिकोनातून या कवीनं अशा जीवनाचा शोध व्यापक स्वरूपात आपल्या कवितांतून घेतलेला आढळतो. जीवनाचा हा शोध घेताना त्याचा शोक दुरितांसाठी गहिवरुन येतो. 'गाणे चैतन्याचे' गातानाही 'सरसर झरते माणूसपण हे, निवांत सरणाच्या वाटेवर' ही त्याची व्यथा 'वाट आहे गोठलेली माणसांच्या वेदनांनी, वादळाचे गीत गाती सूर ते घोटून कोणी' अशा तऱ्हेनं सादर करताना तो पोटतिडिकेने लिहितो,



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

ताल हे बेताल झाले झोकणारे डोलती
अंतरीच्या या स्वरांना छेडणारे सोबती (मैफल)

आणि मग फुलाफुलांतून ‘वरात माझी निघण्याआधी’ कुणाकुणाच्या मनात काटे खुपले होते हा प्रश्न त्याला व्याकुळ करतो. मानवी जीवनातल्या सुखदु:खाचा शोध घेताना हे दु:ख अधिकाधिक व्यापक होत जाते. मोठमोठी धेंडं माजलेली असताना सामान्य लोक कसे गांजले जातात याचं त्याला जाणवणारं दु:ख काळजाला भिडणारं कसं आहे, ते बघा-

झिजली काया झिजली हाडे
विरली माया निजले वाडे
नियतीच्या दारात गायले
सरणावरचे मरण पवाडे (मोक्ष)

‘मरताना जीवन हरले मरणास जिंकण्याआधी’,‘रडणे केवळ भासच असतो, दिगंत होऊन मरणही मरते’, ‘नियतीच्या दारात गायले, सरणावरचे मरण पवाडे’, मरणाच्या अशा उल्लेखांबरोबर

दरवळ कसला हा जगण्याचा
मरणाच्या दारावर विरतो
सरणावरची तिरडी झटकून
इथे अनामिक आत्मा सरतो (अमूर्त छाया)

या काव्यपंक्ती वाचताना मी अंतर्मुख झालो. मी सुरुवातीला उल्लेख केल्याप्रमाणे रमेश प्रदीर्घ काळ ज्या प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत होता, त्यामुळे त्याच्या वैफल्यग्रस्त मनात स्वत:च्या मरणाचे विचार पिंगा घालत होते. ‘अंकुर’ या कवितेत ‘कणाकणातील जीवनगाणे विरून गेले क्षणाक्षणाला मरण चहुकडे भरून आलं’ असं म्हणतानाही त्याला जगण्याची आशा आहे म्हणून ‘नका मालवू दीप चिमुकल्या वातीसाठी’ अशी विनंती तो करतो. उदासिनतेबरोबर हाही विचार त्याच्या कवितांतून व्यक्त होणं स्वाभाविकच आहे. कवीच्या मनाच्या अबोध भागात काव्यनिर्मितीची पाळंमुळं असू शकतात. या अज्ञात भागात संग्रहित झालेल्या गोष्टी नकळत होत



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

असतात. वस्तुत: काव्यनिर्मिती हा कवीचा स्वत:चा व्यक्त झालेला एक विशिष्ट अनुभव असतो. मर्ढेकरांना प्रत्येक लिखाणात एक अनुभूती किंवा अनुभूतींचा गुच्छ, पॅटर्न व्यक्त झालेला असतो, असं वाटतं. कविता किंवा वाङमयकृती ही संभवनीय घटनांची सरळ सरळ माळ नसते, तर भावनात्मक लयाची केंद्रपूर्ण आकृती असते. या दृष्टिकोनातून या कवीच्या स्वत:च्या अनुभूतींचा पॅटर्न त्याच्या कवितांत उतरणं स्वाभाविकच आहे.

तथापि, दु:खाच्या डोहात बुडालेला हा कवी आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्या डोहाच्या काठावर बसून चिंतन करताना दिसतो. मात्र, यामुळेच जन्मापूर्वीच त्याला सोडून गेलेली त्याची कन्या 'लेक ती माझीच होती' या कवितेत 'कोवळी ती कोंब होती, पापणीतील थेंब होती' या शब्दांतून साकार होते. मात्र, या सर्व प्रसंगांवर मात करुन 'गाणे चैतन्याचे' गाताना तो लिहितो -

पसरत जाई दिशादिशांनी
अनवट गाणे चैतन्याचे
लाख दिव्यांतून आनंदाच्या
तेज साजरे चराचरांचे

रमेशच्या मनोवृत्तीत व कवितेत झालेलं हे सुखद परिवर्तन म्हणजे 'नादब्रह्म' कवितेतून साकार होणारा 'ताल, सुरांचा संगम हा तर, सुखद सोहळा आनंदाचा' असाच आहे!

'प्रेम गहिवर' मधील प्रियेची ओढ व तिच्या विरहाची धगही जाणवणारी आहे! तिच्या गोजिऱ्या गळ्यात खुलणारं गीत आणि तिच्या सहवासात दिशादिशांत पाझरणारी हवा, तिच्या नेत्रसोहळ्याने बहरुन आलेले प्रीतिचे सूर या प्रतिमा काहीशा सांकेतिक वाटतात, तरी कवितांतून व्यक्त होणारी प्रणय भावना ठाकठीक आहे. दुसरीकडे तिची' विरह वेदना उरी बोचते /व्याकुळ गाणे निवांत गाते' अशा तऱ्हेनं व्यक्त करताना तिच्या अस्तित्वाशिवाय त्याला साऱ्या जगाचं अस्तित्व शून्यवत भासू लागतं. हा विरह त्याला असह्य होतो. 'वंचनेच्या या महाली, शांत जळते वेदना ही' अशा मन:स्थितीत तो स्वत:लाच पारखा होऊन बसतो. 'प्रेमशिल्प' या कवितेत 'अचानक आलेल्या



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

पावसासारखी' तिची आठवण त्याला येते. ही प्रतिमा खूपच अर्थपूर्ण वाटते. मग रक्तगर्भ वेदनांचं आभाळ त्याच्या उदासवाण्या काळजात भळभळत राहतं अखेर त्याच्या 'मनातल्या लेण्यात कोरलेलं तिचं प्रेमशिल्प कठोर जगातल्या वादळमायेत' विरघळून जातं. तरीही प्रेम ही मानवी जीवनातील उत्कट अवस्था आहे. विरहातून प्रेम अधिकच वृद्धिंगत होत जातं याचा सुखद प्रत्यय पुढील काव्यपंक्तीतून येतो -

तुझे स्पर्श गात्रांत रमती दिवाणे
बहरुन यावे असे रोज गाणे
अशा शब्दांतून उतरलेली प्रणय भावना लोभस वाटते.

'श्रावण गहिवर'मध्ये नाजूक, कोवळ्या, प्रासादिक शब्दांतून श्रावणातील निसर्ग साकार करण्यात या कवीला लाभलेलं यश कौतुकास्पद व देखणं आहे. या दृष्टिकोनातून 'बहर', 'पाऊसगाणे', 'श्रावणसोहळा', या कविता अप्रतिम उतरल्या आहेत. कोवळ्या गवताच्या पात्यावरलं ओलं दंव,गंधणाऱ्या मातीत अंकुरणारं नवं बीज, पावसातलं झिम्मड गाणे, अधीर मनाचे गूज सांगणारे पाऊसगाणे अशी सुरेख वर्णनं वाचताना 'श्रावण सोहळा' ही कविता एका वेगळ्या उंचीवर नेणारी आहे. भिरभिरणारी रानपाखरे, निसर्गातला पडघम, गुलमोहराने सजवलेली वाट, मृदगंधाने बहरलेली रात्र अशा समर्पक शब्दांतून श्रावणाचं सौंदर्य वर्णन करताना तो शेवटी लिहितो -

उनसावली खेळ खेळुनी
उधाणवाटा दंग जाहल्या
क्षितिजावरल्या इंद्रधनुचे
वेड लाविले कुणी जगाला (श्रावण सोहळा)

कवीची सूक्ष्म निरीक्षण शक्ती व कल्पनाशक्ती यांचा सुरेख मेळ या कवितांतून दिसून येतो.

गझल या काव्यप्रकाराचा कवीनं अधिक सखोल अभ्यास करणं आवश्यक आहे. तरीही या संग्रहातील गझलांतून जाणवणारी त्याची वैचारिक प्रगल्भता प्रशंसनीय आहे. जगण्याचे ओझे झाले असतानाही तो जगण्यातच गुंतून जातो. लढत लढत जगताना तो मरणाला विसरून जातो.यापूर्वी मरणाचा



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

वारंवार उल्लेख करणारा कवी इथं मरणालाच विसरून जातो हे सुचिन्हच मानायला हवं. अनिवार भावनांचे हुंकार अंत:करणात साठवून माणसांच्या रक्तात त्यानं विश्वास साधले आहेत. माणसं आपली असोत की परकी असोत, त्यांच्याशी त्यानं रक्ताचं नातं जोडलं आहे,तरी त्याच्या संक्रमण काळात जीवनाचा डाव खेळताना तो हरला असतानाही 'दिनरात चांदण्यांना गगनात वेधले मी'(काट्यात वाट माझी), असा सकारात्मक विचार त्याच्या मनात डोकावतो. 'जा सये तू', 'वरात माझी निघण्याआधी' या गझला अप्रतिम उतरल्या आहेत.

कवीचं स्वत:चं जीवन जसं महत्वाचं असतं, तसंच त्याच्या सभोवतालच्या सामाजिक, राजकीय जीवनाचंही प्रतिबिंब त्याच्या कवितेत पडलेलं असतं. या बदलत्या जीवनापासून तो दूर राहू शकत नाही. या भ्रष्ट जगात सामान्य माणसाचं जीवन भरडून निघतंय. कुणाला उपकारांची जाणीवच नाही. या परिस्थितीवर झगझगीत प्रकाशझोत टाकताना कवी पोटतिडिकेनं 'उन्हाला रोखतो आम्ही' या गझलेत लिहितो-

'दुकाने थाटली त्यांनी उधारी झेलतो आम्ही
अमीरी चाटली त्यांनी भिकेला लागलो आम्ही'

आपल्याशी कृतघ्नतेने वागणाऱ्या माणसांविषयी हा कवी विषण्णपणे लिहितो -

फुलाफुलांतून वरात माझी निघण्याआधी
कुणाकुणाच्या मनात काटे खुपले होते (वरात माझी निघण्याआधी)

चांगली कविता वाचणं हा एक आगळा वेगळा आनंद आहे. अशी कविता वाचताना तिच्यातील काही शब्दांमुळे मन:चक्षूंसमोर काही वस्तूंची, व्यक्तींची, घटनांची चित्रं तरळत असल्याचा अनुभव येऊ शकतो. अशी चित्रं म्हणजेच मानसिक प्रतिमा. एफ.सी.प्रिस्कॉटनं म्हटलं आहे की, 'कवी स्फूर्तीच्या क्षणी फक्त मूर्त प्रतिमाच पाहू शकतो'. म्हणूनच 'प्रतिमा' ही विशुद्ध काव्याची भाषा आहे. प्रतिमा व भाव एकत्र आणण्याची शक्ती फक्त कवीच्याच ठायी असते. याच शक्तीचा उल्लेख कोलरिजनं कल्पनाशक्ती असा केला आहे. सारांश वाचकांच्या डोळ्यांसमोर हुबेहूब दृश्य उभं करण्याची किमया कवी



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

करू शकतो. या संदर्भात हा कवी बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाला आहे, असं मला वाटतं. नमुन्यादाखल एक-दोन उदाहरणं पाहू -

हिरव्या जाळीत दडणारा चंद्र मात्र
अंधारात बुडणाऱ्या आभाळात रडत राहतो
आपल्या चित्कलेला तेजाळून घेत (अंधारयात्री )

किंवा

तुमच्या रथाची पिचकलेली चाकं
जीवनाच्या महामार्गावरच्या मेगाब्लॉकवर कधी रुतून बसतील
ते तुम्हास कळणारही नाही (रथ जगन्नाथाचा )

या दोन्ही उदाहरणांत प्रतिमा व भाव एकत्र आणून त्या त्या प्रसंगाचं हुबेहूब चित्रं वाचकांच्या दृष्टीसमोर उभी करण्यात यशस्वी झाला आहे. कवीला जाणवलेल्या संवेदनांचे सर्व स्पर्श या संग्रहातील बहुतेक कवितांतून शब्दांकित झालेले दिसतात. अर्थात् ते सारख्याच प्रमाणात आहेत, असं नाही. तसेच या कवीवर कुसुमाग्रज, ग्रेस, आरती प्रभू, सुरेश भट या कवींचा प्रभावही जाणवतो. प्रत्येक कवीच्या प्रारंभीच्या कवितांबाबत ही प्रक्रिया स्वाभाविकपणे घडतेच. त्यामुळे या कवितांचं मोल कमी ठरत नाही. शिवाय रमेशनं कोणत्याही कवीच्या कवितांची नक्कल केलेली नाही. तो ज्या खडतर परिस्थितीतून गेला, त्यामुळे त्याच्या काही कवितांमध्ये उदासिनता आणि गूढताही आली आहे. त्याच्या संवेदनप्रवृत्तीला मिळालेली कल्पनाशक्तीची जोड, शब्दांचे न्यास, प्रेम व निसर्ग कवितांमध्ये आलेली शब्दांची कोवळीक आणि अन्यायावर प्रहार करताना आलेला परखडपणा, गीतकाव्यातील ताल व लय, मुक्तछंदातील आकृतिबंध हे मला अतिशय भावले आहेत.

रमेश सावंत याच्या सर्व कवितांत त्याची जीवनानुभूती आणि कल्पनाशक्ती यांचा मेळ साधला गेल्यामुळे त्यांत एक प्रकारचा ताजेपणा व रसरशीतपणा आला आहे. स्वत:च्या आयुष्यातील अनुभव, सभोवतालच्या वास्तवातील भेदकता, उत्कट प्रणयभावना आणि निसर्ग सौंदर्य यांचा सुरेख मिलाफ झालेला हा त्याचा पहिलाच कवितासंग्रह लक्षणीय ठरला आहे. त्यात कृत्रिमता



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

किंवा अतिशयोक्ती आढळत नाही. मातीत जिरणाऱ्या थेंबांमधून चहुदिशांना फुटणाऱ्या त्याच्या अस्तित्वाच्या कोंबामध्ये तो आपल्या जगण्याचा पसारा शोधतो आहे. कलियुगात हरवलेल्या पांडवांसाठी एक 'नवे महाभारत' घडवण्याची जिद्द त्याच्या ठायी आहे. त्याची ही आकांक्षा परिपूर्ण होऊन त्याची कविता मोरपिसाऱ्याप्रमाणे पूर्ण फुलून यावी अशा त्याला माझ्या हार्दिक शुभेच्छा! या शुभेच्छाही त्याच्याच शब्दांत-

कृष्णकलेने झाकलेल्या सूर्याच्या साक्षीनं
चेतव आपलं तेज आणि वेध घे आजच्या कौरवांचा
चल, उचल तुझी लेखणी!



**बाळ राणे**
१३ बी, सेंट्रल पार्क,
विरार (पश्चिम), ४०१ ३०३.
९९६०४९६५६८
इमेल : info@saahityicbalrane.com



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# मन गहिवर

रसिकजनहो,

'गहिवर' या माझ्या पहिल्यावहिल्या कवितासंग्रहाची शब्दफुलांनी भरलेली ओंजळ आपल्याला सादर करताना मन गहिवरुन येतंय. मला अजूनही आठवते की बालपणी कुर्ला येथे शाळेत शिकत असताना बाळ राणे सरांच्या 'शुभदा क्लासेस' मध्ये आयोजित केलेल्या कवितालेखन स्पर्धेत सरांनी माझी कविता निवडली होती व माझ्यातल्या काव्यबीजाला हेरलं होतं. पण नंतर राणे सरांशी माझा संपर्क तुटला आणि कोवळ्या वयात अंकुरलेलं माझं हे काव्यबीज पुरतं फुलण्याआधीच कोमेजलं होतं. आयुष्यभर मुंबईच्या महानगरीय जगण्याच्या धावपळीत थकलेली माझी पावलं आता कुठे कवितेच्या या वळणावर येऊन थोडी भारावूनच सावरली आहेत. वयाची साठी जवळ आलेली असताना भोवतालच्या जीवनाकडे कविमनाने पाहताना बरंच काही जाणवायला लागलं आणि मनातल्या भावनांना पुन्हा एकदा चालना मिळून शब्दांच्या फुलांनी कवितांचे मळे फुलवायला सुरुवात केली.

सर्वप्रथम वर्ष २०१० मध्ये कोकण मराठी साहित्य परिषदेच्या देवनार शाखेने आयोजित केलेल्या काव्यवाचन स्पर्धेच्या अंतिम फेरीत काव्यवाचन करण्याची संधी मिळाली. यानंतर मात्र मैत्रेयी फाऊंडेशन, मुंबई, कवितांगण -गोरेगांव, अक्षरधन -बोरिवली, एकता कल्चरल अकादमी, अक्षरगंध-विलेपार्ले (पूर्व), शेतकरी साहित्य परिषद -आटपाडी, अत्रे कट्टा- गोरेगांव, दादर सार्वजनिक वाचनालय, नवोदित साहित्य संमेलन, बारामती, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अशा निरनिराळ्या संस्थांनी आयोजित केलेल्या कवितावाचन व काव्यलेखनाच्या स्पर्धा व कार्यक्रमांतून मी भाग घेतला व रसिकांचा प्रतिसाद मिळविला. माझ्या कवितेचा हा सर्जनशील प्रवास



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

अविरत चालला आहे. गेल्या वर्षी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या एम.ए.(मराठी) प्रथम वर्षाचा अभ्यास करताना कुसुमाग्रजांची समग्र कविता अभ्यासायची संधी मिळाली. यामुळे कवितेच्या साधनेचे मी एक व्रतच घेतले आणि झपाटल्यासारखे ग्रेस, वसंत आबाजी डहाके, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, कुसुमाग्रज, सुरेश भट, पु.शि.रेगे अशा विविध नामवंत कविंच्या कवितांचे व त्यांच्या समीक्षांचे वाचन केले. यामुळे माझ्या काव्यगंगेच्या प्रवाहात निरंतर भर पडत गेली व विविध राज्यस्तरीय काव्यस्पर्धांमधून ७ पुरस्कार मिळाले. शेतकरी साहित्य परिषद (इर्जिक) यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येवरील 'मातीतला माणूस' या माझ्या कवितेस कविवर्य गदिमांच्या जन्मस्थळी त्यांच्या जन्मतिथीला बोलावून प्रथम पुरस्काराने गौरविले ज्यामुळे माझा आत्मविश्वास दुणावला. त्याचबरोबर गेल्या वर्षी (२०११) च्या अधिष्ठान, कलमंच, चैत्राली, अनामिक, दरवळ, माणवैभव व नविता या दिवाळी अंकांमधून तसेच 'रविवार महाराष्ट्र टाइम्स' व 'रविवार सकाळ' मधून आणि या वर्षी 'अस्वस्थ काळजावरचं मोरपिस' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहात देखील माझ्या कविता प्रसिद्ध झाल्या.

याचदरम्यान मी आपल्यासारख्या बऱ्याच काव्यरसिकांशी माझ्या कवितांबद्दल चर्चा सुरु केली. ज्येष्ठ साहित्यिक व कवी बाळ राणे सर, माझे माजी शिक्षक बाळ सावंत सर, विविध प्रकाशक व साहित्यविषयक संस्था इत्यादींनी मला कवितासंग्रह प्रकाशित करण्यासंबंधी मोलाचे मार्गदर्शन व सहाय्य दिले. विशेषत: या काव्यसंग्रहाचे सुबक पुस्तकरुपात मुद्रण करण्यासाठी इंडिया प्रिंटिंग वर्क्सचे श्री. आनंद लिमये यांचा व या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यासाठी 'स्मित प्रकाशन' यांचा तसेच या कवितासंग्रहाला साजेशा, सुंदर व विलोभनीय मुखपृष्ठाची निर्मिती करणाऱ्या सुप्रसिद्ध सुलेखनकार व चित्रकार श्री. कमल शेडगे यांचा मी शतश: ऋणी आहे. 'ऋण गहिवर' मध्येही अशा काही व्यक्ती व संस्थांचा उल्लेख मी कृतज्ञतापूर्वक केला असला तरीही याव्यतिरिक्त हा गोवर्धन पर्वत उचलण्यासाठी ज्या ज्या व्यक्तींचे अमोल सहकार्य लाभले आहे त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार. या सर्वांच्या सहयोगाचा सुखद परिणाम म्हणजे माझ्या संवेदनशील कवीमनाला स्फुरलेल्या मुक्त



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

छंदातील कविता, गीते व गझलांचा समावेश असलेल्या ८८ काव्यरचनांचा 'गहिवर' हा कवितासंग्रह होय.

मला जाणीव आहे की कवितेच्या या खडतर वाटेवर मला अजून बराच मोठा पल्ला गाठावयाचा आहे आणि मला रसिक वाचकांच्या अपेक्षापूर्तीसाठी भरपूर काव्यसाधना करावी लागणार आहे. माझ्या कवितेच्या प्रवासाच्या या वळणावरुन मागे वळून पाहताना मला गदगदलेल्या अंत:करणाने आणि गहिवरल्या मनाने आभार मानावयाचे आहेत ते माझे ऋषितुल्य गुरु आणि ज्येष्ठ साहित्यिक श्री. बाळ राणे सर यांचे. वयाच्या ऐन पंचविशीत त्यांच्यावर ओढवलेल्या अपंगत्वाच्या दुर्धर आजारानेसुद्धा त्यांची आभाळाला गवसणी घालण्याची उमेद हरपली नाही. अगतिक न होता काळाशी आणि आयुष्याशी अविरत झुंज देऊन त्यांनी आपली 'आभाळवाट' आपल्या 'दुर्दम्य' आकांक्षेने चालती ठेवली व जीवनाच्या 'महासागरा'तील काव्याचे 'दवबिंदू' वेचून ते अक्षरश: 'आयुष्य नावाचं महाकाव्य' जगले. आपल्या साहित्यातून 'अमुचा पेला दु:खाचा' असं सांगताना देखील रसिकांच्या मनांचा 'अंतर्वेध' घेत त्यांनी आपल्या दु:खाश्रूंना आवरतं घेतलं आणि मराठी साहित्यजगतात आपली अशी एक 'नवी दिशा' निर्माण केली.

श्री. बाळ राणे सरांना जेव्हा मी माझ्या काव्यसंग्रहाची प्रस्तावना लिहिण्याची विनंती केली तेव्हा त्यांनी मला केवळ आपला विद्यार्थी म्हणूनच नव्हे, तर माझ्यातील एका अंकुरत्या कवीला जी प्रेरणा आणि आशीर्वाद दिलेत त्याबद्दल त्यांचा मी कायमचा ऋणी राहीन कारण हे ऋण फिटण्याच्या पलीकडचे आणि शब्दांत न सांगता येणारे आहेत. तरीदेखील माझा हा शब्द गहिवर ज्येष्ठ साहित्यिक श्री. बाळ राणे सरांना सादर करतो -

'बाळपणी कवितेचा अंकुर
मनात रुजवून तुम्हीच दिधला
कृतज्ञतेने सादर करतो
गहिवर शब्दांचा हा पहिला'

मानवी जीवनातील आणि त्याच्या भोवतालच्या निसर्गातील सौंदर्य, माधुर्य, लय, ताल, गीत, संगीत, आनंद, दुख, भाव आणि भावना, वेग आणि आवेग



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

या सगळ्यांचे चित्रण माझ्या कवीमनातून उत्कटपणे यात शब्दबध्द केलं गेलंय. मला आशा आहे की आपण या  काव्यसंग्रहातील सगळ्या कवितांचा तसेच गीते व गझलांचा समरसून आस्वाद घ्याल. अंत:प्रेरणेने स्फुरलेल्या या सर्व कवितांतून माझ्यातल्या एका संवेदनशील कवीला वेळोवेळी शब्दांतून मी व्यक्त करीत गेलो आणि हा शब्द गहिवर आकाराला आलाय. हा मानवी जिवांच्या वेदना व संवेदनाचा वेध घेणारा व हजारो डोळ्यांतल्या आसवांचं देणं फेडण्याचा जो प्रयत्न मी 'गहिवर' या माझ्या पहिल्या काव्यसंग्रहातून केलाय तो मराठी काव्यरसिकांनी कृतार्थ करावा, हीच माझी या क्षणाची अपेक्षा आहे. अखेरीस माझ्याच एका कवितेतील शब्दांतून तुम्हाला पुन्हा एकदा सांगावेसे वाटते -

'हा उत्सव आनंदाचा
ना केवळ अक्षरमेळा
वेदना मनाच्या लिहितो
घन क्षितिजावरचा भोळा'

**रमेश सावंत**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# अनुक्रम

## मुक्त गहिवर

१. चिन्मय आभाळाची पायवाट
२. अंधारयात्री
३. मनातल्या तळघरात
४. अधांतरी
५. क्षितिज अपार
६. जत्रा
७. हरवलेली पावले
८. चांदरात
९. आंधळी कोशिंबीर
१०. आदिमाया
११. नवे महाभारत
१२. हे शब्दांच्या उल्के
१३. भावूक रान
१४. अदृश्य भावनांची वहिवाट
१५. अस्तित्वाचा शोध
१६. उध्वस्त
१७. आभास महानगरीय जगण्याचा
१८. अथांग
१९. सहस्त्रधारा
२०. वास्तव आयुष्याचे



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

२१. पानगळ
२२. दूरचा तारा
२३. संचिताच्या रेषा
२४. गाथा
२५. आमच्या सातबाराची विफल कहाणी
२६. सायबर खेळी
२७. काळोख
२८. विरक्त
२९. रांग
३०. रथ जगन्नाथाचा
३१. नि:श्वास
३२. तो जगतो आहे
३३. दहशत
३४. समाधी
३५. मातीतला माणूस
३६. आत्मभान

**गझल गहिवर**

१. वरात माझी निघण्याआधी
२. अंगार माझे बोलणे
३. तुझे लाजणे
४. चेहरे नवेनवेसे
५. सूर गजलेचे
६. काट्यांत वाट माझी
७. उन्हाला रोखतो आम्ही
८. जा सये तू
९. या घडीच्या जीवनाला
१०. रूजुवात
११. सजून येती सूर कोवळे



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

**प्रेम गहिवर**

१. धुंद
२. तुझेच केवळ भास मनातील
३. हळुवार क्षण
४. साद
५. स्पर्शगंध
६. नखरेल अदा
७. ध्यास
८. व्याकुळ
९. प्रेमशिल्प

**गीत गहिवर**

१. सूर्यफुलांसम जगण्यासाठी
२. गहिवर
३. निराधार
४. आभाळाचे देणे
५. परी गोड तू
६. असे जिव्हाळे
७. गाणे चैतन्याचे
८. अनामिक
९. अर्थगर्भ एकांती
१०. जागर नव्या युगाचा
११. मरणास जिंकण्या आधी
१२. लेक ती माझीच होती
१३. नादब्रह्म
१४. गीत माझे धुंद झाले
१५. ताल -बेताल
१६. तुझ्याच रंगी
१७. अमूर्त छाया
१८. अंकुर



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

१९. कवितेच्या वाटेवर
२०. मैफल
२१. काजळमाया
२२. मोक्ष
२३. कृष्ण बावळा
२४. ऋतू

**श्रावण गहिवर**

१. बहर
२. पाऊसगाणे
३. दिनमान
४. सल फुलते ती
५. माया
६. श्रावण सोहळा
७. झुलवा
८. शब्द शब्द भिजताना



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# मुक्त गहिवर

e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# चिन्मय आभाळाची पायवाट



माझ्या मनाच्या विषण्ण गाभाऱ्यात
दरवळत असतो तुझ्या चोरपावलांनी येण्याचा गंध
तेव्हा पापण्यांच्या आडून डोकावणाऱ्या नास्तिकतेला
माझ्या आस्तिक आसवांमध्ये बुडताना पाहतो
आणि तुझं निराकार स्वरुप ''अहं ब्रह्मास्मि'' म्हणत
या नश्वर विश्वाच्या पसाऱ्यात विलय होण्यासाठी
माझ्या साकार देहात पसरत जातं

तुझ्या अगोचर अस्तित्वाचे गहनगंभीर घंटानाद
माझ्या नसानसात घुमत राहतात
अन दूरवरच्या निरामय आभाळात विरून जातात
तेव्हा तुझ्या अगतिक चरणांवर वाहिलेल्या फुलांमधून
फुलत राहते माझी नास्तिक भक्ती
अनामिक वारकऱ्यांनी गायलेल्या
उर्जस्वल अभंगांतून उमटणाऱ्या आर्त वेदनेसारखी

आता माझी बहकणारी नास्तिकता पाठुंगळीला मारून
तुझ्या विस्तीर्ण चिन्मय आभाळात
कोरलेल्या पाऊलवाटांवरुन चालताना
मी शोध घेतोय अनंतकाळ अनाहतपणे
माझ्या आणि तुझ्यातल्या पुलाचा
जो दिसत नाहीये माझ्या डोळ्यातल्या सजल भावनांना

**(एकता कल्चरल अकादमीतर्फे आयोजित राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेत प्रथम पुरस्कारप्राप्त कविता)**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# अंधारयात्री

उजेडवाटा फुलल्या तरीही
आपण सगळे अंधारयात्री
कसोशीनं बेतलेलं आपलं गळकं आभाळ
डोक्यावर घेऊन चाललेले असतो

डोंगरातल्या म्हातारीसारखी
वेडीवाकडी चालणारी
जीवनाच्या काटेरी वळणांची पायवाट
अख्ख्या जगाचा पसारा तुडवीत
दिशांना बांधून घेत पळत असते

तरारुन फुटलेलं तांबडं
आसमंतात पसरायच्या आधीच
जगण्यातल्या कष्टांनी अंगांगावर गोंदलेली मातकट रेखाटनं
अवघ्या आयुष्याची मशागत करुन पसार होतात


तेव्हा अस्तमान सूर्याच्या नजरेत भरणारी काळरात्र
अमवासेला दटावत पुन्हा अंधारून  येते
आणि आपला कुजका संसार पाठुंगळीला घेऊन
विरघळतो सगळा परिसर
दु:खांच्या कभिन्न काजळीत

हिरव्या जाळीत दडणारा चंद्र मात्र
अंधारात बुडणाऱ्या आभाळात रडत राहतो
आपल्या चित्कलेला तेजाळून घेत



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# मनातल्या तळघरात



बेफाम नाचून पैंजण थकलेले
पावलांनी मात्र अजूनही रुणझुणत्या तालावर ठेका धरलेला

सारंगीवरच्या बोटांमधून विरघळत येणारं संगीत
जेव्हा वाजायला लागतं मनातल्या तळघरात
तेव्हा तिथे साचलेली अक्षरफुलं फुलायला लागतात
आणि चोहोकडून येणारे निषादाचे स्वर
डोकावतात पडद्याआडूनच्या राजस डोळ्यांतून

तिथला एक एक क्षण थबकत, घुटमळत, बहकत
मैफलीत दंगलेल्या लयीत नाचण्यासाठी
पुन्हा एकदा आपल्याच नादात मश्गुल होतो

आणि आसमंत वेडावणारे हे धुंद क्षण
घुसळून टाकतात सर्वकाही
मनातलं मनापासून...



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# अधांतरी

कळलं होतं मला
की माझं जीवन
माझ्यासाठी नाही आहे
तरीही जगण्याची वांझोटी वासना
पीडत राहीली दररोज

पोटातल्या भुकेसाठी
दाहीदिशा वणवणताना
मनातला वणवा पेटतच राहिला
आणि आभाळ गोठून डोळ्यांत उतरलं तरीही
माझी हताश आसवं साकळली नाहीत जराही

आता रस्ते गुणगुणत चालतात
माझ्या पायांच्या तालावर
आणि हातावरच्या रेषा नाचत राहतात
मनस्वी गाण्यांच्या ठेक्यावर

मात्र गहिवरल्या नजरेमधून
हरवत चाललेल्या गर्दीत
माझ्या दुखावलेल्या भावनांचं
सांत्वन करीत फिरताना
माझ्या आयुष्याची भीक मागतोय मी
जगण्याच्या वाटेवर अधांतरी लटकलेल्या
माझ्याच देहाकडे



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# क्षितिज अपार

निजली पहाट
भिजली वाट
थिजली झाडे
चांदणडोही

डोळ्यात काहूर
काळीज हूरहूर
आकाश भेसूर
वेदनांचे

नक्षत्रे प्राणांत
स्वप्नांच्या देशात
पहारे वनात
अदृश्यांचे

कुजणाऱ्या मातीत
जळणारी नाती
रक्ताचा पूर
भावनेला

वाहत्या दिवसांना
आठवांची साठवण
नेणीवेच्या जगाचे
क्षितिज अपार



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



## जत्रा

दरसाल येणारी जत्रा
धुळवड उडवून जाते
हवेत विरणारे क्षण
आठवात साठवून घेते

दमल्या जिवांची गाथा
डफलीत मिसळून गाते
दावणीस बांधल्या दिशांना
चौखूर उधळून लावते

आकाश मोकळे होऊन
चक्रीला भिडायला जाते
हलणाऱ्या वाऱ्याची वेणी
भेलकांडत मातीला मिळते

चमचमत्या किरणांची नक्षी
गाण्यांच्या वाटेला चालते
पोरांच्या खेळांची वाजंत्री
गोजिऱ्या बाहुल्या दावते

काहूर गर्दीला बेफाम
तुफान लोकांचे धावते
सांजेला साजरे चांदणे
नक्षत्र मनात भावते



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



# हरवलेली पावले

हळुवार क्षणांचा मोहर
अजूनही अंगभर बहरलेला
दुपारच्या उदासल्या उन्हांनी न्हाऊ घातलेल्या झाडांनी
भिरभिरत धावणाऱ्या वाऱ्याला अलगद झेलून घेतलेलं
कुणाच्या तरी प्रतीक्षेत अंगणात पहुडलेल्या सावल्यांच्या नक्षीवर
मी माझ्या पावलांची रांगोळी घालत चाललोय

जेव्हां येथली चुकार पाखरं देखील वितरागी सूर आळवतील
तेव्हां शहारलेली संध्याकाळ माझ्या अंगणात उतरत असेल
अन् माझ्या उरात न मावणाऱ्या चंचलतेला आवरताना
सूर्यकिरणांचा सडा कोमेजलेल्या फुलांतच ढळेल
तेव्हा मावळत्या दिवसाच्या लाचार नजरेत भरलेलं
कोमल वेलींचं सळसळतं तारुण्य पिण्यास आतुर झालेली झाडे
लाजेनं आणखीनच चूर झालेल्या पानांना फितूर न होता
काळजाच्या आरपार जाणारी उदासवाणी गाणी गात गात
या अंगणात विव्हळत बुडणा-या दिवसाबरोबरच विलयास जातील
तेव्हा काजळलेल्या धूसर सांजेच्या काळोखात
अगतिक, अधीर आणि अनावर होऊन
मी मात्र जागत राहीन
माझ्या अंगणात हरवलेल्या
तुझ्याच पावलांच्या शोधात ...



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# चांदरात

या शांत वनातील विस्कटलेल्या झाडांनो
तुमच्या नितळ हळव्या झुलत्या पंखांना कवटाळून घ्या
उन्मुक्त वाऱ्याच्या लहरींवर
निथळत आलेल्या संथ निरव गारव्यात

जेव्हा किलबिलणारी रानपाखरं कशीबशी उडत
तुमच्याच आश्रयास येतील
तेव्हा करवादत पुन्हा भिरकावून द्या
आपली आकाशभरली ओंजळ
येथल्या गर्भसाक्षी तृणांतून उजळत येणाऱ्या
सायंकाळच्या उन्हाच्या कवडश्यांवर

आता ही व्यामिश्र चांदरात विहरताना दिसेल
तुमच्या रुणझुणत्या मनाच्या अंतर्डोहात
जी सत्वर जागत असते
अनवरत पाझरणाऱ्या चांदण्याला स्पर्शून
तुमच्या नजरभेटीस पुन्हा रुजू होण्यासाठी

पहा त्या काजळवातीतल्या मिणमिणत्या प्रकाशात
झिरपत जाणाऱ्या ओढाळ आसवांबरोबर
रिमझिम बरसणारं गाणं दरवळत येईल
जे तुमच्या ओथंबल्या घनव्याकुळ विस्तारातून
फुलत जाणाऱ्या अमृतमयी जगन्मातेला आळवीत राहील
इथल्या मोहमयी धुंदीच्या अधीन होण्यासाठी...



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# आंधळी कोशिंबीर

जगत जगत जळणं म्हणजे जगणं नव्हे
ती तर नुसती जगण्याची पराकोटीची धडपड
आणि दु:खांच्या फोलपटांत आपलं मरण शोधत फिरणं असतं

केवडा सुगंधी असला तरी त्याची धार गळा कापायला पुरेशी असते
तसं सुखांचं झालंय वरवरच्या भ्रामक भुलभुलैयात
मनांत भीतीनं कालवाकालव करणारी बेरक्या आठवणींची भुतं
मानगूट सोडायला तयारच नसतात
म्हणून तर माणसं गळक्या बासनांत आपलं अस्तित्व गुंडाळून बसतात
आणि आठवणींचं शेवटचं भूत मानगुटीवरुन उतरायची वाट पाहात जगत राहतात

एकटेपणाच्या भयानं घाबरुन जाऊन तरी त्यांनी काय करायचं?
कारण आता त्यांना या भुतांची पुरी वासलात लावायची आहे
म्हणूनच अश्वमेधाच्या घोड्यांप्रमाणे
दशोदिशांत आपल्या दशेचे चौखूर उधळून
अस्मितेच्या पेटत्या मशालींच्या निर्वेध उजेडात
नशिबाच्या आंधळ्या कोशिंबिरीच्या खेळात
आपल्याच सावल्यांशी लपंडाव खेळत
ते आपलं हरवलेलं संचित शोधीत फिरतात

आणि जीवनाच्या भयाकूळ काळोखात दडलेलं सर्वस्व जपताना
भूतकाळाची भूतं पुन्हा मानेवर बसण्याआधी
या आंधळ्या कोशिंबिरीच्या खेळात
हतबल होऊन आपली अखेरची खेळी खेळतात
समोर दिसणाऱ्या मृत्यूला
आणखीन एकदा हुलकावणी देण्यासाठी...



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# आदिमाया

वर्तमानकाळाची पावलं चालताहेत
तिच्याच पावलांवर पाऊल ठेऊन
आणि कलियुगाच्या ओठांवर विलसतंय
तिच्या क्रांतीचं गीत

जिच्या आकांक्षांचा रथ विहरतोय
मनस्वी वाऱ्याच्या लाटेवर
आणि जिचं तेजाळ रूप
बहरत चाललंय
पिढ्यानपिढ्यांच्या तरुणाईत

तिच्या गतीचं भान
गतानुगतिकांना काय ठाऊक असणार
कारण वेगात दौडणाऱ्या बेभान हरिणीसारखी
तिच्या स्वत्वाची चाल
आता जगाला हादरवते आहे

पहा आता पंख फुटलेत
महामहिम राक्षसांनी कोंडून ठेवलेल्या दुर्गेला
आणि ती घेतेय महाभरारी
अस्मितेच्या असीम अवकाशाला गवसणी घालण्यासाठी
आपल्या अजेय बाहूंना सरसावून

कदाचित
हीच असेल महामाया
जी या मायावी दुनियेच्या मायाजालात
आपल्या मायेनं या दुनियेतील अगोचर शक्तींना
दे माय धरणी ठाय करुन
घेईल पुन्हा नवा अवतार
कलियुगातील आदिमायेचा



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# नवे महाभारत

चल, उचल तुझी लेखणी!
लाव तेजस शब्दांचे बाण तुझ्या अमोघ प्रतिभेच्या धनुष्याला
नियतीने जागोजाग पेरलेले शत्रू मारायचेत ना तुला ?
मग अर्जुनासारखा हतबल का होतोयस?
जा मागोवा घेत त्या नतद्रष्ट पावलांचा

तुला ठाऊक आहेच की
जीवनाचा हा खेळ आपल्याच माणसांनी मांडलाय
मग त्यांत हार वा जीत कुणाची का असेना
तुला तर पार्थाप्रमाणे लढायचं आहे

तर मग हो पुढे आणि उचल तुझ्या अस्मितेचे गांडीव धनुष्य
कारण आता कृष्ण नाही येणाराय तुला सावरायला
म्हणूनच त्यांच्या भात्यातल्या बाणांनी तुझे शरसंधान होण्यापूर्वीच
वत्सा, उचल तुझा हात
आणि घे त्यांच्या काळजाचा ठाव तुझ्या लेखणीने

तुला घडवायचंय नवे महाभारत
कलियुगात हरवलेल्या पांडवांसाठी
कृष्ण कलेने झाकलेल्या सूर्याच्या साक्षीनं
चेतव आपलं तेज आणि वेध घे आजच्या कौरवांचा

चल, उचल तुझी लेखणी!

**(पूर्वप्रसिद्धि - ‘अस्वस्थ काळजावरचं मोरपीस’ प्रातिनिधिक काव्यसंग्रह)**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



# हे शब्दांच्या उल्के

(कवयित्री उल्का पाटील यांच्या ' बहर ' या पहिल्या कवितासंग्रहाच्या निमित्ताने)

तू आकाशावर रेघ ओढलीस
डोंगराएवढ्या जिद्दीनं
आणि पेटवलंस अक्षरभान
तुझ्या काळजातल्या विदीर्ण दु:खातून

लिहिलीस तुझ्या जीवनाची गाथा
तुझ्या अगतिक भावनांचे शब्द शब्द जोडून
पण विटली नाहीस जगताना आपलं संचित
जे क्षणोक्षणी तुला छळत होतं
विस्कटलेली मनं दुरुस्त करणाऱ्या
मनस्वी माणसांच्या कारखान्यात

आता पाहतोय मी तुला
सळसळत्या तेजोमय रुपांत
कवितेच्या अवकाशात उन्मुक्त अवगाहन करताना

हे शब्दांच्या उल्के
तुला शतश: अभिवादन



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



# भावूक रान

माझ्या शब्दगर्भ वाटांना अनाथ  करून
कुठं गेलंय ते इथलं निर्जन रान
जे निष्ठुर क्षणांच्या गजाली सांगत
मरगळल्या मातीत मनसोक्त उगवणाऱ्या
रानफुलांना कुरवाळत होतं

अजाण रात्रींनी घातलेला धुमाकूळ कमी होता म्हणून की काय
चांदणं आभाळभर भरुन ओसंडत होतं
आणि माझ्या डोळ्यांत पडलेलं
अवघ्या विश्वाच्या पसाऱ्याचं प्रतिबिंब
मुकाट तरंगत होतं उध्वस्त स्वप्नांच्या तळ्यात

अनामिक नजरांनी पहारे देताना
जेव्हा उडवून लावली माझी झोप
तेव्हा पहाटेच्या दवबिंदूनी शाकारलेली झाडं
गुमान लवंडत होती क्षितिजाच्या पारावर
उगवत्या सूर्याचं नमन करीत
आणखीन एका खुशाल दिवसात रमण्यासाठी

आता मी बघतोय की
तेजाळ सूर्यकिरणांशी लपंडाव खेळताना
मायाळू भुईत पेरलेलं ओंजळभर अक्षरबीज
कविता होऊन उगवत आहे
माझ्या मनाच्या परिसरात दाटलेल्या भावविश्वातलं
एक भावूक रान होऊन



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# अदृश्य भावनांची वहिवाट

कसलेल्या शब्दांतून वाहणारी सुरावट
नुसतीच अदृश्य भावनांची वहिवाट नसते

ती तर कुणाकुणाच्या मनातल्या
मायावी विचारांचे ओझे घेऊन
पायाखाली चिरडत असते
हलाखीच्या क्षणांनी कुरवाळलेली मळवाट

कधी कण्हत, धाय मोकलत शोधत बसते
आठवांच्या धुक्यात हरवलेल्या माणसांना

मात्र मायावी डोळ्यांच्या आडून
ओघळणाऱ्या बुबुळांची होणारी धांदल पाहताना
धास्तावलेल्या नजरा चुकवितात
आपल्याच माणसांचा वेढा

जेव्हा मावळतीला विझणाऱ्या सूर्याला पाहून
उठू लागतात अनोळखी सावल्या पुन्हा एकदा
तेव्हा निराकार मातीच्या घरांतून
काळरात्रीला सलाम करीत
मिटत जाते हतबल झालेल्या जीवांचे
अगोचर आणि अनामिक अस्तित्व

आणि नवख्या दु:खाला कवटाळून
संपवितात ती आपलं दुर्धर जिणं
तेव्हा नाहकच साकळलेल्या अंधारात
परतून येणाऱ्या चांदणसुरांना आळवीत
मनांत कोरलेली मदांध अक्षरं
दिसू लागतात वेडावलेल्या अंधुक क्षितिजावर...



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# अस्तित्वाचा शोध

आपल्या अस्तित्वाला अर्थच उरत नाही
जेव्हा निरर्थकाचे पक्षी अस्तित्वाच्या आभाळात भरारी घेतात
गतिमान काळाची गरज म्हणूनच केवळ
आपण आपल्या गतीनं धावू पाहतो
आणि गोटीबंद व्याख्यांमध्ये चपखल बसणाऱ्या शब्दांतून
आपलं अस्तित्व साकारायचा अयशस्वी प्रयत्न करतो

वर्तमानास नाकारून जगणं हे जगणंच नसतं मुळी
तरीही आपल्याच निर्ढावलेल्या चष्म्यातून आपलं अस्तित्व आपण शोधत राहतो
पण काळाची थोरवी गाताना अर्थहीन जगण्याचे हिशेब मांडायचे असतात
म्हणूनच अर्थावाचून जगणं हे शब्दांच्या पलिकडच्या वास्तवासारखं कडवं वाटतं
जे जाळतं पण जळत नाही
अन् विरघळत राहातं आपल्या दुखांच्या ज्वाळेत

तेव्हां अस्तित्वाच्या पडद्याआड लपलेल्या मायावी जगासाठी
जोपर्यंत एका सार्थक शेवटाची सुरुवात होत नाही
तोवर आपण अनंत यातना अनवरतपणे भोगत राहतो
आणि अखेरीस
आपल्या अस्तित्वाच्या शोधाचा निरर्थक प्रवास संपलेला असतो.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# उध्वस्त

रेल्वेच्या रुळांखाली
बापसाची जमीन गेली
तेव्हा झाडं गुरांसारखी आक्रंदत होती
आणि घरातलं भेसूर जीवन विझू लागलं होतं

फाटलेलं आभाळ डोक्यावर घेऊन
तालुक्याच्या बाजाराची काटेरी वाट
अनवाणी तुडवणारी घरच्या लेकराची आजी
नातवाच्या नोकरीच्या स्वप्नांचे छिन्न तुकडे
आपल्या काळजात रुतवून
अखेर उपासपोटीच मेली

आता माय बसते डोळे लावून रुळांकडे
आशाळभूत नजरेने पाहात
धडधडत जाणाऱ्या रेल्वेचे डबे
लेकराच्या चाकरीचं भूत
अजूनही छळतंय तिला
विटलेल्या पदराच्या ठिगळातून
डोकावणाऱ्या विदीर्ण आभाळातल्या
कधी न बरसणाऱ्या ढगांसारखं



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

बेकार प्रकल्पग्रस्त लेक
कधीतरी रुळांवर तडफडत मेला
तेव्हा पेपरात अवाक्षरही नव्हतं
मात्र रुळांवर धडधडणाऱ्या गाडीखाली
लेकराच्या चिंधड्या होताना
उडणाऱ्या रक्ताच्या चिळकांड्यांची रेघ
शेताच्या वाटेवर उमटत गेली होती

आता उध्वस्तल्या बापसाची पावलं
फाटलेल्या उरात लेकराची याद घेऊन
अजूनही अज्ञातात डोळे लावून थबकत राहतात
आणि येणाऱ्या प्रत्येक गाडीतून उतरणाऱ्या माणसांत
नाहकच शोधताना दिसतात
आपल्या प्रकल्पग्रस्त लेकराला
जो कधीच परतून येणार नाहीये...



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# आभास महानगरीय जगण्याचा

सर्वत्र पसरलेला जगण्याचा आभास
इथे तिथे अन् पलिकडे दूरवर
विमानतळाच्या जागी विमानांआधी
जिथे फक्त गिधाडंच उडतात भरभर
घरावर घर
थरावर थर
महानगरीय घरांना
लागलीय घरघर
रोज तीच शिळी पहाट
रोज तेच वाट पाहाणं
नऊ त्रेचाळीसच्या लोकलचं गाणं
दोन रुळांवर भेलकांडत लटकत जाणारे हात
सूर्य उगवतो आणि बुडतो
यांच्या नजरांपासून कोसो दूर
उजळलेली रात्र
अंधारलेलं मन
मिल ते मॉल
रोज होतंय परिवर्तन
पायाखालचा एफएसआय विकून
झोपडीचा पुनर्विकास
पण घरातलं घरपण
होतंय वेगानं भकास
वैश्विक विकासाचं गणित
काळकामाच्या गतीनं
बजेटच्या गुंतावळीत
जगण्याचा प्रस्ताव
मरणाच्या वाटेवर
पुरलेलं गाव

**(पूर्वप्रसिद्धि - आचार्य अत्रे कट्टा, कांदिवली यांच्यातर्फे प्रकाशित 'मुक्तांगण' विशेषांक २०१२)**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# अथांग

सळसळणाऱ्या पाण्याचं काही खरं नसतं
ते कळत नकळत पळतच असतं
खळखळणाऱ्या धारांनी वाहून नेललं
दुधाळ धारेसारखं त्याचं तेजाळ रूप
ओढाळ डोळ्यांना दिसेनासं होईपर्यंत
आंतल्या आंत कुढणाऱ्या मनातली खळबळ
चळवळ करीत जाणाऱ्या निर्मळ जलातल्या अथांग प्रवाहांत
डुचमळत वळत आपले मृण्मय किनारे शोधत असतं

कितीही खोल पाण्यात स्वत:ला ओघळून घेतलं तरी
त्यात बुडणाऱ्यांच्या मनाचा ठाव घेता येत नाही
कारण त्यांचं अचेतन पार्थिव
सळाळणाऱ्या पाण्यावर कसल्याच रमलखुणा ठेवून गेलेलं नसतं
आता नि:संग तरंगांवर तरंगणारी निर्मोही पाणपाखरं देखील
शोधताना दिसतात वळवळत जाणाऱ्या पाण्यातली खळबळजनक आवर्तनं
ज्यांच्या खळाळत्या अंगावर हेलकावतंय
कुजलेल्या जगातलं निर्माल्य
हळहळणाऱ्या पाण्यावर कधीतरी उमटतील त्यांच्या पार्थिव शरीरांचे तरंग
तेव्हा जळत राहताल त्यांच्या शारीर जीवनातले गळत गेलेले क्षण

आणि हा ओघ असाच पाण्यातून पाण्याकडे
वाहत राहील कलकलाट करीत
पळापळाने, जळाजळाने, थेंबाथेंबांतून सागराकडे
अनंत, असीम, अनादि आकाशापर्यंत...



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



# सहस्त्रधारा

तू कोसळताना
बहरत असतात मनामनातले दिवस
आणि तुझ्या सहस्त्रधारांच्या खळखळाटात
आमच्या रात्री निजतात
काळोखाची चादर ओढून

तू जेव्हा बरसतोस धुवांधार
तेव्हा घनविभोर झाडांच्या पानापानावर
अधीरतेने ओघळणाऱ्या थेंबांतून
वाजू लागते एक अबोध विराणी
भिजणाऱ्या मातीच्या नसानसांत

असाच कधी कधी पडत रहातोस संततधार
आमच्या अवघ्या जगात महाप्रलय होऊन
आणि करतोस निराधार
आमचं कपर्दिक मानवी जगणं
जे कधी तुझ्या आगमनासाठी झुरलं होतं

वाहून नेतोस तू दुथडी भरलेल्या नद्यांना
महासागराचं रुप देऊन
तेव्हा जलमय झालेल्या आमच्या डोळ्यांत
सामावत नाही तुझं रौद्र रुप



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



अरे, फरक फक्त हाच आहे तुझ्यात नि आमच्यात
की तू जसा आहेस तसाच राहतोस
आणि आम्ही मात्र असतो लाचार
तिन्ही त्रिकाळ हात पसरुन
तुझं नक्षत्रांचं देणं वाहावून टाकतो
आमच्या तथाकथित विकासगंगेत
जी बुडवून टाकतेय आमच्या अस्तित्वाला

आणि तरीही आम्ही डोळे लावून बसतो
क्षितिजापार पसरलेल्या अमर्याद आभाळाकडे
जिथं आता संथपणे लहरणाऱ्या ढगांऐवजी
वेगानं लिहिली जात आहे
आमच्या सर्वनाशाची कविता



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# वास्तव आयुष्याचे

आयुष्याची पानं अलगदपणे उलगडताना
अवचितच कधी गोठलेले क्षण विरघळू लागतात
आणि आपल्या क्षुब्ध डोळ्यांमधून
उसळून येतात विचारांचे तप्त ज्वालामुखी
जे क्वचितच कधीतरी शांत झालेले असतात

गहन विवरासारख्या गूढ अंतर्मनातील
दग्ध झालेल्या विकारांची राख
आपल्या मुठीत घेऊन आपण धावत राहतो
कोसळू घातलेल्या निराशेच्या विराट आकाशाखाली
हे ठाऊक असूनदेखील की
आपणास पेलणार नाहीये आपला गोवर्धन
जो दशांगुळं उरलाय आपल्या अवतीभवती

आयुष्याच्या पानापानावर दररोज उगवणारं आपलं अवकाश
त्या आकाशमार्गी उल्कांना वाकुल्या दाखवीत
विश्वाच्या अमर्याद पोकळीतून बेभानपणे बाहेर पडू पाहते
मग अंगभर विरघळणाऱ्या चांदणरात्री
आपल्या वास्तवाची अवास्तव गाणी गाताना
मन भरुन पावलं तरीही
अवकाशातल्या आपल्या सावलीबरोबर
थकलेल्या पावलांनी
आपण अनंतकाळ चालतच राहतो
दिशाहीन, उन्मुक्त पण अनासक्त होऊन...



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# पानगळ

बहरत्या दिवसांतून होणारी पानगळ
झुलत्या झाडांवरची नक्षी ओघळून टाकत असते
पण डोळ्याचं पारणं फेडणारी गुलमोहराची पानं मात्र
मखमली चादर अंथरलेल्या रस्त्यावर विखरुन पडतात
आणि आपल्या गर्भात मावणारं आकाश सामावून घेत
निवांत पडून राहतात झाडांच्या काळ्याभोर सावल्यांमधून

कधी तरी येणारी लोचट वाऱ्याची सर्द झुळूक
आसमंतात बहकणारा दरवळ लपेटून घेते
तेव्हां नववधूसारख्या लाजणाऱ्या झाडांच्या फांद्या
आपल्या माना वेळावत आपसांत कुजबुजत राहतात
माजोर रानवाऱ्याच्या गजाली...

मनातलं गूज गुणगुणत गाणारी
वेणूच्या बनातली शीळ
काळजात वाजणाऱ्या सुरांवर
मनमोहक गीत विणत असते
आणि एक आनंदविभोर नदी
संथपणे निथळत जाते
अंगभर मोहरलेल्या गुलमोहरावरुन

पृथ्वीच्या प्रेमात पडलेल्या विदग्ध चंद्रकिरणांसाठी
अधीर झालेली रात्र मात्र माघार घेत असते
आणि सर्वदूर साठलेल्या पानगळीला
आपल्या पोटात सामावून घेते

तेव्हां दरवळत राहणाऱ्या गुलमोहराच्या झाडांतून
खुलत जातो एक अनावर विस्तार
जो आतूरलेला असतो गवसणी घालायला
आभाळाच्या मायेला


e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# दूरचा तारा

दूरचा तारा कवेत घ्यायला आतुरलेली
माझी वासना जिरवायला हवी असं वाटतं
पण जेव्हा माझीच जीभ वळवळ करायला लागते
तेव्हा चळवळत असलेली लालसा मी आवरू पहातो

मुक्त झालेल्या मला मीच बंधनं कशी घालायची ?
कारण माझं शल्यच उमजत नाहीये
मोजून काही दिवसांचाच पाहुणा आहे असं म्हणायचं तर
ब-याच रात्रींमध्ये सांचलेला गाळ कसा काढायचा ?
आणि त्या भयाण रात्रींत साठलेल्या संचितांची गाथा
पुन्हा पुन्हा वाचायची तरी कशासाठी ?

मात्र आताशा विस्मृतीच्या ढगांना वेडावत
कधीही कोसळणा-या पावसासारखे
अवचितच येणारे माझे बहाणे
मला पाठ झालेत कानामात्र्यांसह

तरीही मातीत जिरणा-या थेंबामधून
मी चहुदिशांनी फुटणा-या माझ्या अस्तित्वाच्या कोंबांमध्ये
फुलवित राहीन माझ्या विदीर्ण जगण्याचा पसारा
हे माहित असताना सुद्धा की ते पुन्हा मातीतच मिळणार आहेत



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# संचिताच्या रेषा

आजमितिच्या कलाकृतींनी उधळलेले रंगच बघायचे तर
केवळ आपल्या आभासांच्या त्रिमितित डोळे जखडून चालणार नाही

आपल्या आंधळ्या नजरेने चित्रातले आभासमय तरंग
अंत:करणाच्या तळातून भरभरून पाहायचे
आणि वाटलंच तर एखादं चित्र भिंतीवरुन काढून
त्याचे वितळलेले पापुद्रे अवकाशाच्या पोकळीत फेकून
आपल्या मिटलेल्या पापण्यांत सामावून घ्यायचे

कारण, न जाणो चित्रांतल्या रेषांनी टिपलेलं
एखादं चुकार पाखरु
आपल्या निबर हातांच्या तळव्यांत घेत असताना
भोवतालच्या निर्जन पोकळीत उडून जाईलही

नाहीतरी त्याचं भाकित चित्रांतल्या क्षितिजावरच कोरलेलं असतं
आणि आपलं संचित मात्र घुटमळत असतं
आपणच अमानुषपणे रेखाटलेल्या चित्रांतल्या
आपल्या उर्मट हातांच्या रेषारेषांमधून...



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## गाथा

आयुष्याची नागमोडी वळणं
जेव्हा तिरप्या चालीच्या नियतीला चकवू पाहतात
तेव्हा मी होतो निर्मम काळाच्या हातातला
एक निराधार मूक-बधीर बाहुला

आपल्या अगतिक नजरेनं भोवतालचं आकाश वेधताना
हातांतून निसटून जाणाऱ्या जीवनाचं गणित
मी लिहून ठेवतो माझ्या निष्प्राण पाऊलवाटांवर
आणि युगानुयुगे डोळ्यांत साठवलेल्या क्षणांसाठी
कुरवाळत बसतो निराधार झालेल्या आसवांना

आता पुरे झालं हे दु:खपुराण
जागवूया म्हणतो उरात दडलेलं अवसान
जे पुढच्या प्राक्तनाची वाटचाल माझ्या उनाड पावलांनिशी करेल
आणि जगत राहील
माझ्या भाळी कोरलेल्या अक्षरांची गाथा
इथल्या अज्ञात अनंतात विलीन होईपर्यंत...



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# आमच्या सातबाराची विफल कहाणी

आजवर न पाहिलेलं आता आम्हाला डोळे भरुन पाहाचयंय
तेही आमच्या निष्प्राण डोळ्यांच्या कडांना ओलं न करता
त्यांच्याच वेगानं धावायचंय आम्हाला
थिजलेल्या पावलांना डोक्यावर घेऊन

मुस्कटदाबी झाली तरी बोलायचंय
त्यांच्याच वैश्विक भाषेत
आमची मुळाक्षरं धुळीत मिळाली तरी
लिहायचीत त्यांचीच धुळाक्षरं
आमच्या उजाड क्षितिजावर कोरलेली

आणि तरीही मिरवायचीय आमची इंटरनॅशनल डिग्री
विदेशी दलालांच्या हाटबाजारातल्या दुकानांसमोर
आमच्या नशिबाच्या कोऱ्या पाटीसारखी

नाहीतरी आमचं गाव, आमची माती, अन् आमची माणसं
त्यांनी विकायला काढलीच आहेत लिलावात
तेव्हा कशाला ऐकायची आमच्या सातबाराची विफल झालेली रडकथा

आता या देशाच्या आभाळात उडणार नाहीयेत स्थलांतराचे गीत गाणारे फ्लेमिंगो
कारण त्यांच्या सातबारावर देखिल
विकासाची कहाणी कधीचीच नोंदली गेली आहे
आता येथे फक्त असंख्य गिधाडे उतरतील
आमच्या अर्धमेल्या जीवनातला रस शोषायला

मग करुया की साजरं याचंही एक ग्रँड इव्हेंट
सोकॉल्ड स्वदेशाच्या अंतर्राष्ट्रीय भाषेत इंटरनेटवरुन वैश्विक बोली लावून
आणि जमलंच तर तिथंही आमचं जग गहाण ठेवूया त्यांच्याकडे
आमच्या उरल्या सुरल्या जीवनातला चोथा चघळण्यासाठी



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# सायबर खेळी

हो रुजुवात आहे आपल्या डिजीटल दु:खांना हळुवारपणे पाखर घालण्याची
आणि आजवरच्या स्वप्नांनी समोरच्या स्क्रीनसेवरमध्ये विलय होण्याची

काय सांगावं कदाचित तुम्ही डिलीट करुन टाकाल मेमरीत साठलेला सगळाच डेटा
पण कीबोर्ड वरच्या शब्दांना भान येण्यापूर्वीच फाइलींमधून गायब होण्याचं तंत्र
तुमच्या आमच्या सांकेतिक भाषेला कळण्यापूर्वीच
आयुष्याचा झोकदार प्रोग्राम डाउनलोड व्हायला लागतो

तुमचे आमचे सगळे पासवर्ड आता रिसायकल बिनमध्ये जाऊन बसतात
कदाचित हॅकर्सनी सगळ्या फाइली गायब करताना
संकेत दिले असतील तर पहा आपल्या मेल मध्ये
एखादं भयानक रंगीत चित्र पॉवरप्वाइंटच्या ॲनिमेशनमधे विस्कटताना
आपल्याच जन्मतारखा अन कूटप्रश्नांनी नेहमी सारखाच गोंधळ माजवून
सायबर दुनियेतलं आपलं अस्तित्व नाकारलं पण असेल

तेव्हां सावध असा आपल्या देहभानातली आयडेंटिटी संभाळण्यासाठी
कारण गतकाळात तुम्ही केलेल्या सायबर खेळातली एखादी खेळी
आता तुमच्यावरच उलटू शकेल
तोवर तुमची हार्ड डिस्क फॉर्मेट करा
आणि पाहात रहा रिस्टार्ट करुन तुमचा काँप्यूटर
जो वेबदुनियेच्या महाजालांतून तुमची कुंडली छापताना
तुमच्या अस्तित्वाची दखलच घेत नाहीये

कारण गुळगुळीत झालेले कीबोर्ड बडवता बडवतां
तुम्ही आम्ही तर कधीचेच डिलीट झालेले असतो
त्याच्या सायबर कोशातून परमनंटली...



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# काळोख

गर्द डोळ्यांत विरघळत जाणारा
काळ्या कुट्ट दिशांतला
अंधार मिट्ट काळोख

अव्यक्ताच्या अगोचर प्रदेशात
काजळलेल्या पापण्यानी
युगानुयुगाचं कातडं ओढून
स्वत:ला मिटून घेतलेलं

करवादणाऱ्या काळजातली काजळवाट
अखेर पायउतार होऊन
घनघोर मनाच्या क्षितिजापार
आठवणींच्या भूतांना गाडत जाते

आणि आपलं अनाकार, अगतिक अवकाश
निर्मम निराकार होऊन
दु:खाच्या अमवासेतील घनदाट रंगात बुडून घेत
उधळीत राहते रात्रीचं देणं
घनासक्त आकाशात.



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# विरक्त

मी माझ्या आरपार पाहतो
तेव्हा दिसतं अंगभर विखुरलेलं माझं वर्तमान
आणि नियतीच्या किनाऱ्यावर
आपल्याच तंद्रीत पहुडलेला मी
रतिमग्न पहाटेस आपल्या कवेत घेऊन

या रक्तवर्णी वाटांवरून चालताना
मी  जरी विटलो असलो
तरीही माझी आत्ममग्न पावलं
काळावर मात करत जातील
माझ्या मेंदूतल्या विचारगर्भ उल्कांची रेखीव नक्षी
संचिताच्या आभाळावर कोरण्यासाठी

जेव्हा माझ्या आत खोलवर चिघळू लागतील
माझ्या अव्यक्त आर्त वेदना
तेव्हा पाझरत जाईल माझं प्राक्तन
माझ्या विरक्त डोळ्यांतून
गदगदलेल्या रात्रीचं चांदणं होऊन



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# रांग

मुंगीच्या पावलांनी सरकणाऱ्या रांगेत
अविरत उभे राहून वाट पाहिली तरीही
पावलांच्या मागेच थिजलेली त्यांची पावले
जखडून घेतल्यागत जमिनीस खिळलेली

नजरेत सगळा दिवस साकळलेला
अंगांगातून निथळत जाणाऱ्या घामाच्या धारा
आणि भान विसरत चाललेली पावलं
मनाच्या विषण्ण कोपऱ्यात रुजू घातलेले उदास सूर आळवीत
समोरच्या एलसीडी वर सरकणारे शब्दांचे पट्टे डोळ्यांत सामावून घेत
पायाखालची आधीच उध्वस्त झालेली जमीन पुन्हा उकरू पाहतायत.

एव्हाना हलत्या पडद्यावर विकल्या गेलेल्या नाच्यांनी बेसुमार धुमाकूळ घातलेला
रांगेतल्या दग्ध डोळ्यांतून पाझरणाऱ्या नजरा
विस्कटत जाणाऱ्या त्यांच्या वस्त्रांची
दचकत दबत चाहूल घेतायत
अन पावलं थिरकताहेत पुन्हा एकदा विस्कटलेली रांग लावताना
नाच्यांच्याच नाचाच्या तालावर, डुलणाऱ्या लयीवर
आपलं आसुसलेलं स्वत्व घुसळून घेत
त्यांच्याच वेगांत, त्यांच्याच नादात
वर्दळत चालली आहेत
रांगभर पसरत जाणाऱ्या झिंगलेल्या दशेने
अर्धचेतन, अर्धजागृत...



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# रथ जगन्नाथाचा

विझू पाहणाऱ्या आकांताने
जगण्याच्या इर्षेचा रथ इथवर खेचून आणलेला
भेसूर झालेलं आकाश आदिम सुरांचा मागोवा घेतंय
यात्रेकरुंच्या थकलेल्या पावलांवर
निथळणाऱ्या घामाच्या थेंबांचं साकळलेलं तेज
सर्द झाडांमधून विटलेल्या वाटेवर वाट पाहात थबकलेलं

आता तुम्हीच आळवा ते वीतरागी आलाप आणि विलाप
कारण मोकळ्या अवकाशात विहरणारी पाखरं
आपलं घरटं शोधताना जशी आक्रंदन करतात
तसे तुमच्या रडण्याचे बेसूर सूर
तुमच्या विस्थापित घराघरातून सैर करतील
तेव्हा आपल्याच आवेगानं धावणाऱ्या दिशाहीन वरातीमागून
घुमत राहतील तुमचे सायंकालीन राग

नाहीतरी सत्वहीन झालेलं तुमचं अस्तित्व
आंधळ्या जगन्नाथालाही पाहवणार नाहीये
तरीही उरात धुमसणाऱ्या सुरांनी नाथाचे गीत गाताना
तुमच्या रथाची पिचकलेली चाकं
जीवनाच्या महामार्गावरच्या मेगाब्लॉकवर कधी रुतून बसतील
ते तुम्हास कळणारही नाही

कारण तुमच्या आकाशातला ध्रुवतारा कधीचाच निखळून पडलाय
जो दिशा दाखवील असं वाटलं होतं
तुम्हाला, त्यांना आणि त्या रथातल्या नाथाला



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## नि:श्वास

कसं सांगू तुला
की भावुक अक्षरं लपलीत आपल्या मौनात
जी तुझ्या पारदर्शी डोळ्यांतही
मी वाचू शकलो नव्हतो

पहाटेच्या दु:खार्त काळोखात
दडून राहिलेल्या आठवणी
येत राहिल्या मनातल्या क्षितिजावर
आतल्या आंत तडफडणाऱ्या
सहस्त्र प्रेमळ भावनांना घेऊन

तुझा देह जोवर निजून राहिलाय
आपल्या अंगावर लपेटून
सुखद गारव्याची दुलई
तोवर तुझ्या विस्कटलेल्या केसांतील
चुरगळलेल्या फुलांची एक झलक
पाहून घेईन मी झकास
माझ्या निष्पाप श्वासातला
अखेरचा नि:श्वास सोडताना



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## तो जगतो आहे

तो बघत असतो
खिडकीच्या फ्रेममधलं जग
विटक्या डोळ्यांच्या कॅमेऱ्यातून
तेव्हा त्याच्या नजरेत मावत नाही
माणसांनी चेपलेल्या रस्त्यावरची अव्याहत वाहणारी गर्दी

तो सटकतो
आपल्या दिवाळखोर खिशात हात घालून
झिजलेल्या चपलांना पायातून ओढत
गहिवरल्या रस्त्यातल्या धूळीत मिटलेली घायाळ वाट शोधायला

तो नसतो जेव्हा
समोरच्या दुकानात शिजणाऱ्या भाजीपावात
तेव्हा तो फरपटताना दिसतो
गर्दीतल्या वेढ्यात
आणि मग फसतो तिरपागड्या मढ्यांच्या तिढ्यात

तो तेथून खिसकतो कसाबसा
आपले खिसे चाचपत
चण्याफुटाण्याच्या आशेने
तेव्हा चणेवालासुदधा
त्याची आय माय काढून
पचकन् थुंकतो त्याच्या अंगावर
तेव्हा तो देखील
त्याच्या बापाच्या अवलादीची शिवी मारतो फेकून त्याच्यावर



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

तो आता उभा आहे नवा चणेवाला होऊन
विव्हळत जाणाऱ्या रस्त्यावरच्या
फुटक्या दुकानांसमोर
फाटक्या नजरेनं गर्दीला पाहात
विसरून जातो
आपला गांजावलेला दिवस
आणि विझत जाणाऱ्या रात्रीला
सलाम ठोकत बघत राहतो डोळे फाडून

तो जगत राहण्याची कला फक्त त्यालाच अवगत
म्हणून तर तो जगतो, जसा होता तसाच



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## दहशत

थरार मनात, जनात  दिशांत,
सुडाच्या रक्तानं मांडला आकांत

निवांत जाहले घरांचे आवार,
भयाच्या छायेला दयेचा आधार

असह्य दु:खांचे कल्लोळ घरांत
उदास चालली प्रेतांची वरात

अशांत शहर, गल्ल्याही भकास,
फुलांच्या देशात, मृत्यूची आरास

आसवें गाळुनी झोपले संसार
झिजले लोक ते होऊन बेजार


आंधळ्या जगाचा वेंधळा गोंधळ
भयाण वाजते, आकाशी वादळ

हाडांची चाळण, मांसाचा चिखल
माजले रावण, राम हा विकल

संपलो आपण, संपेना मीपण
येथल्या मातीत विषाचे रोपण



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



# समाधी

साधना विश्रांत
मनात आकांत
अमूर्त विचार
विसावलेला

सांडले आभाळ
मातीत सकळ
बीजाचा अंकुर
गर्भारलेला

मागणे उधार
पोटाला आधार
हातांची ओंजळ
विस्तारलेली

ज्ञाताची दखल
विदग्ध विकल
देहाची समाधी
हरपलेली

**(पूर्वप्रसिद्धि -'अस्वस्थ काळजावरचं मोरपीस ' प्रातिनिधिक काव्यसंग्रह )**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# मातीतला माणूस

इथल्या काळ्या मातीतल्या गंधात त्याचा घाम मिसळून गेलाय,
पावसाच्या थेंबांसाठी व्याकुळलेली शेतं जागोजागी थिजलेली,
त्याच्या राबलेल्या हातांनी कष्टानं पिकवलेल्या पिकांवर
टोळधाडींचा हल्ला झालेला

आता क्षितिजावरचा पहाटेचा तारा दिसेपर्यंत त्याच्या पेंगुळलेल्या डोळ्यांत
शोकमग्न काजव्यांची वरात चाललेली,
आणि त्याला तर भुकेल्या पोटानं सारी रात्र जागून काढायचीय
अमावास्येच्या भयाकुळ अंधारात पेरलेल्या चांदण्यात

त्याला कधी कधी आठवण येत रहाते,
ढवळ्या पवळ्यांचीं, पाण्याच्या मोटेची,
झुळझुळ वाहणाऱ्या पाटातल्या पाण्याची आणि
चोचीतून पिकाचे दाणे वेचणाऱ्या रानपाखरांची,
बायकोच्या मायेची, चतकोर भाकरीच्या भन्नाट चवीची
त्याच्या फाटलेल्या संसाराचं आभाळ दारिद्र्याच्या ढगांनी व्यापलेलं
गोठ्यातल्या पाडसाच्या डोळ्यांत गायीच्या मायेची साठवण असणारं
आईचा पान्हा न पाझरल्यानं जसं रडणारं बाळ
तसं तिचं पदोपदी दुधाला लुचणारं तोंड आताशा निस्तेज झालंय

गहिवरून पोटात सामावून घेतेय तो या आभाळाच्या मायेला, नदीच्या पाण्याला
झाडांच्या छायेला, घराच्या वाटेला, देवळाच्या घंटानादाला
अन् झुळझुळत्या झऱ्याच्या पाण्याला
अशी कितीक दिसांची भूक त्यानं खपाटीस लागलेल्या पोटात साठवून ठेवायची ?
सावकाराच्या कर्जाला भिऊन तोंड लपवायला तो जाईल तरी कुठे ?
विटलेल्या घरात सरपण सरलेलं नसलं तरी, भुकेला नुसताच कोंडा असल्यानं
गरिबीच्या दु:खाची सावली आणतेय त्याच्या बधीर मनाला मरगळ
पिचलेल्या आर्त जिवाची संवेदनाशून्य तडफड आता सहन होत नाहीये त्याला



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



दूरचा तारा अमावास्येच्या गहन गूढ अंधारात लुप्त होत दिवस वर येत असेल तेव्हा
सूर्यदेवास साक्षी ठेवून मरायला जाताना पोरांच्या शाळेकडे बघताना
त्याचा फाटलेला उर पुन्हा पुन्हा दाटून आला तरी
नवा दिवस मात्र रोजच्यासारखाच उगवेल
वैश्विक बाजारभावांच्या ठळक मथळ्याखाली
आणखी एका शेतकऱ्याच्या आत्महत्येची बातमी पोटात घेऊन

**पूर्वप्रसिद्धि - रविवार महाराष्ट्र टाइम्स (दि. २७.११.२०११)**
**शेतकरी साहित्य परिषद (इर्जिक)च्या राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेत प्रथम पुरस्कार**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# आत्मभान

विमनस्क मनातली अंगभर विखुरलेली आवर्ते घेऊन
त्यांच्या डोळ्यातली आशा आभाळभर वावरतेय
आणि निपचित पडलेले टाळ मृदुंगांचे सूर
गतानुगतिक झालेल्या अनवट वाटांवरून
त्यांच्या वीतरागी देहांना लपेटून जातायत

त्यांना शोधत आलेलं संचित
कधीचंच वाट पहात पहुडलंय
त्यांच्या रिक्त ओंजळीत टाकलेल्या भाकर तुकड्यावर

तरीदेखील विकल झालेलं निशाण खांद्यावर फडकवीत
बेभानलेल्या रांगेत आपले निष्प्राण देह नाचवीत
त्यांच्या धगधगत्या आर्त जीवांचं रिंगण
मरगळलेल्या धूळीत आपल्या राकट पाउलखुणा उमटवीत चाललंय

दिंडी अजून पोचायची आहे
आत्मभान विसरून त्यांना नाचायचं आहे
आपल्या खचलेल्या मनाच्या देव्हाऱ्यात
भंगलेल्या आयुष्याचे दिवस पाहताना देखील देहभान विसरून
त्यांना अविरतपणे गायचे आहेत अक्षत अभंग

मात्र गाभाऱ्यातल्या विरक्त ज्योतिसमान
आपल्या अंतरात्म्यास जागवत असताना
त्यांचे भक्तिभान दरवळत राहील
असेच अनंतकाळापर्यंत...



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

गझल

# गहिवर

e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# वरात माझी निघण्याआधी

असे उमाळे उरात माझ्या रुतले होते
नव्या जगाचे जुने दिलासे धुपले होते

फुलाफुलांतून वरात माझी निघण्याआधी
कुणाकुणाच्या मनात काटे खुपले होते

दयामरण मी मागत होतो मरण्यासाठी
कसे जिव्हाळे जिवात माझ्या जपले होते

कुणी म्हणावी नशेत गाणी सुरेल माझी
सुरात माझे शब्द बापडे लपले होते

असे कसे मी जगात आता जगावयाचे
माझे जीवन विकण्यासाठी खपले होते

**(कवितांगणतर्फे आयोजित राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेत उत्तेजनार्थ पुरस्कारप्राप्त कविता)**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# अंग्यार माझे बोलणे

या जीवाचा सूर आहे यार माझे बोलणे
जो मिळाला त्यास झाले प्यार माझे बोलणे

बेघरांच्या भावनांची भिंत कोणी तोडली
आसवांनी ऐकलेले फार माझे बोलणे

काळजातील वेदनांचे भान कोणाला नसे
बोलते माझ्या सीमेच्या पार माझे बोलणे

या सुखांनो आज माझ्या संगतीला पाहुणे
दु:ख माझे गोठवी अनिवार माझे बोलणे

धार नाही वार नाही ही कशी तलवार रे
शब्द झाले पेटते अंगार माझे बोलणे



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



# तुझे लाजणे

जगाची कशी ही जुनी रीत आहे
कुणाच्या नशीबी अशी प्रीत आहे

जशी दाटते ओढ ह्रदयात वेडी
तसे गोड प्रणयात संगीत आहे

कळीला कळेना फुलावे कसे ते
तिला चांदणे आज फुलवीत आहे

मजेची दुजा बात तसलीच आहे
सखीला कशी रात भुलवीत आहे

सजे साजणे प्रीत माझी पहाटे
तुझे लाजणे आज शृंगार आहे



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## चेहरे नवेनवेसे

येथे विसावलेले चेहरे नवेनवेसे
मौनात बोलके सारे मोहरे नवेनवेसे

ते गीत गात होते धमन्यांत वाहणारे
जग वेगळेच त्यांचे बहरे नवेनवेसे

दडवूनी आपुली चिंता का सांगती व्यथा ते
फसवती रोज ते चेहरे हसरे नवेनवेसे

हरवल्या गोड दिवसांचे हळुवार भास का होते
मन उदास होऊन रूसले दुसरे नवेनवेसे

जरी दोष नव्या चेहऱ्यांचे चेहऱ्यांतच दडले होते
नव तेज नव्या जगण्याचे पसरे नवेनवेसे



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# सूर गजलेचे

जगण्याचे ओझे झाले जगण्यातच गुंतून गेलो
लढता लढता जगताना मरणाला विसरून गेलो

दु:खाला रोजच माझ्या मी सोबत घेऊन फिरलो
नशिबाची फसवी खेळी सरणावर खेळून गेलो

दैवाच्या गूढ कोड्याला कोड्यातच ठेवून आलो
दररोज नव्या डावाला हरताना जिंकून गेलो

स्वप्नातच वेड्या माझ्या आरसा मनाचा झालो
विसकटल्या चांदणराती क्षणभर मी हरखून गेलो

हरपल्या सुखाच्या साठी मी जीवन शोधत झुरलो
सजविण्या सूर गजलेचे शब्दांना जोडून गेलो



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# काट्यांत वाट माझी

काट्यांत वाट माझी पण धावलो असा मी
फुलती कळी मिळाया अवकाश शोधले मी

का यातना जीवाला छळतात रोज माझ्या
मृत्यूस दावणीला आजन्म बांधले मी

अनिवार भावनांचे हुंकार साठवोनी
रक्तात माणसांच्या विश्वास सांधले मी

आधार पावलांना प्राणातल्या युगांचा
वेगात जीवनाच्या संगीत साधले मी

फसलो असा जरी मी हा डाव खेळताना
दिनरात चांदण्याना गगनात वेधले मी



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# उन्हाला रोखतो आम्ही

दुकाने थाटली त्यांनी उधारी झेलतो आम्ही
अमीरी चाटली त्यांनी भिकेला लागतो आम्ही

फुलांनी रंग उधळावे तमाला झाकण्यासाठी
दिशांनी रोज उजळावे नभाला सांगतो आम्ही

तुटावे पाश हे आता नको ती वासना खोटी
कशाला तेच देखावे फुकाचे पाहतो आम्ही

रचावे का पुन्हा पुन्हा अडाणी शब्द ते सारे
दिसाया रंग बहराचे उन्हाला रोखतो आम्ही

कुणाला सूर जे प्यारे हवे ते गीत गाणारे
जगाला आज हे सारे उखाणे घालतो आम्ही



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## ज्या सये तू

लाजऱ्या माझ्या स्वरांना सूर तू देऊन जा
वाहत्या वाऱ्यात माझे गीत तू गाऊन जा

मोकळ्या केसांत वेडे फूल तू माळून जा
आगळ्या धुंदीत सारी रात तू उधळून जा

कोवळे हे स्पर्श माझे आज तू घेऊन जा
सोहळे साऱ्या क्षणांचे अंतरी ठेऊन जा

भारलेल्या भावनांचा गंध तू लेऊन जा
बंध सारे तोडूनी मज एकदा पाहून जा

जा सये तू दूर आता सोडूनी सारी मजा
दुख माझे सांचलेले भोगतो माझी सजा



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# या घडीच्या जीवनाला

या घडीच्या जीवनाला धाडसी हा वेग आहे
सोबतीला माणसांचा तामसी आवेग आहे

धार वज्राची कशाला वार करण्या जागते
जागल्यांचा हा पहारा कोणता उद्वेग आहे

हात का हातात त्यांचे गुंफलेले कोवळे
धावत्या पायात त्यांच्या वादळाचा वेग आहे

केवढी माजोर शस्त्रे परजली होती तयांनी
वेध घेण्या रोखणारी पत्थराची रेघ आहे

गायचे त्यांनी पवाडे कां कुणाचे रोज ते ?
गर्जतो गगनात वेडा एकला तो मेघ आहे



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# रुजुवात

जगतो असा कसा मी सांगू कसे कुणाला
समजून घेत नाही जगणे कुणाकुणाला

गाती खुशाल कोणी अपुलेच गीत ओठी
कळ सांगते उराची दुखणे कुणाकुणाला

हसण्यात भास वेडे त्यांच्या खुळ्या जगाचे
दु:खात का जमेना रडणे कुणाकुणाला

असतो जरी जीवांना आधार सोयऱ्यांचा
छळतात काळरात्री किरणे कुणाकुणाला

रुजुवात भावनांची शब्दांत गुंतलेली
बहरात सोसवेना रुजणे कुणाकुणाला



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## सजून येती सूर कोवळे

सजून येती सूर कोवळे जराजरासे
अजून माझ्या मनी खेळती जराजरासे

तरल दिवाणे अंकुरणारे प्रेम बावळे
जसे उमलते फूल कळीतून जराजरासे

कसे आवरु मोह तुझे हे सखे साजणी
उरात खुलती स्नेह तराणे जराजरासे

रात सोबतीण पुनवेला ही उदास भासे
चंद्र उसासे सोडत आहे जराजरासे

गंधित होऊन हृदय पाझरे क्षणाक्षणाला
यौवनातले खेळ बहरती जराजरासे



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# प्रेम गहिवर



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



# धुंद

कधी कधी कळ्यांसवे तळ्यात चांदणे फुले,
तुझेच गीत गोजिरे गळ्यात गोड ते खुले

अधीर सूर जाहले उरात दु:ख दाटले
तुलाच पाहुनी सये सुरेल नाद गुंजले

नवी पहाट तीच वाट नभात मेघ साजरे
तुझ्यासवे नवी हवा दिशादिशांत पाझरे

चुंबनी अलिंगनी धुंदलो अम्ही जरा
तुला उन्हात पाहुनी लाजली वसुंधरा

निवांतले मनातले अशांत पाखरु नवे
जनातले वनातले क्षणात पेटले दिवे

वाट पाहुनी तुझी धुक्यात सांज हरवली
धरा नभास भेटता अबोल बोल बोलली

**(पूर्व प्रसिद्धी - 'अधिष्ठान' दिवाळी २०११)**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## तुझेच केवळ भास मनातील

कळले होते जरी मला ते
तुझेच केवळ भास मनातील
मूक दिशांच्या आभासातून
गहिवरती का संथ भावना ?

हलती डुलती फुले बोलती
कळवळणारी हळवी भाषा
तनामनातील सुशांत कळ ती
वावरते का अंध होऊनी ?

अशीच झुरते विहरत वेडी
निथळत ओली चिंब देखणी
निरागसांच्या सावध नेत्री
विरह वेधती उदासवाणी

कुणी पहावी कशी साहूनी
काळजातली कोमल सल ती
कुठवर गेले निवांत होऊन
गगन बिचारे श्यामल रंगी



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## हळुवार क्षण

हलकेच कुणी मन लाघविते
हळुवार क्षणांना जागविते
हृदयात कळ्यांचे जग उमले
हरवून जिवाला घेत झुले

हे दिवस असे गुलजार कसे
उमलले गुलाबी फूल जसे
हसताना कोमल गोल खळी
हरते मदनाची जात खुळी

हलत्या झुलत्या केसांमधुनी
घन विभोर रेशीम ये दिसुनी
हरपती दिशा दिन मालवता
हरवते दशा मन पाघळता

तन फुलता मार्दव तव खुलले
तोऱ्यास तुझ्या का जग भुलले ?
हळवा क्षण बघ तुज लाजवितो
हलके हलके मज जागवितो



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## साद

शांत आहे रात्र काळी, साजणी तू मोहणारी
माझिया गाण्यात साजे, धुंदलेली प्रीत न्यारी
साद मजला द्यावयाला, आज येथे तूच नाही
वंचनेच्या या महाली, शांत जळते वेदना ही

तू अशी ये सांजवेळी, लेवूनी त्या चांदण्यांना
त्यागलेले आसवांनी धुंद माझ्या पापण्यांना
ते किनारे शोधतो मी गाजणाऱ्या सागरी
मिलनाच्या या घडीला, तू अशी का लाजरी ?

वेगळा आनंद होता, छंद जडला आगळा,
स्पंदने गाती मनाशी, गंध झाला मोकळा
ते बहाणे बोचणारे, ते नजारे जाचणारे
मी दिवाणा तोच आहे, जाणतो सारे इशारे

लाखदा मी स्पर्शलेली, ही तुझी काया अशी
कैकदा तू हर्षलेली, साजणी बावनकशी
सोहळे ते पाहिले मी, रंगणारी प्रीतही
वेगळ्या वाटा पुन्हा का, सांग कसली रीत ही

**(पूर्वप्रसिद्धि - ' कलामंच ' दिवाळी २०११)**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



# स्पर्शगंध

तुझ्या मोरपंखी केसांत झुलती
फुले माळलेली ह्रदयात सलती
तुझे रूप डोळ्यांत या साठलेले
जणू चांदणे ग नभी दाटलेले

सुखाच्या क्षणी या मनी धुंद झालो
तुझ्या स्पर्शगंधात न्हाऊन गेलो
फुलावा असा वेल का भावनांचा
खुलावा जसा खेळ हा जीवनाचा

अशा देखण्या स्वप्ननगरीत राणी
भिडावी जीवाला नवी प्रीत गाणी
तुझे गीत गातो झुरवीत काया
जुने ते तराणे, जुनी तीच माया


नजरेस नजरा अशा भेटताना
उरी वेदनांचा रुतावा तराणा
तुझी चाल बेभान करिते मनाला
हा भास की ध्यास वेडा बहाणा

तुझे स्पर्श गात्रांत रमती दिवाणे
बहरुन यावे जसे रोज गाणे
हलकेच हातात तू हात घे ना
स्वप्नात हरवून सत्यात ये ना

**(पूर्व प्रसिद्धी - 'चैत्राली' दिवाळी २०११)**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



## नखरेल अदा

नखरेल अदा लयदार गती
नजरेत तुझ्या मदमस्त रती
तू सजता मादक रुप तुझे
बहरते अशी तू रुपवती

तू असता जग हे मोहरते
तू नसता जीवन का हरते ?
थबकतो काळही पळताना
दिनरात कसे मन बावरते ?

मदिराक्षी तू मदिराच जशी
मदनास खुळा करतेस कशी ?
स्वर मदांध झाले क्षणभर ते
प्रेमातूर मी, तू सावरशी

तन चंचल पैंजण रुणझुणते
जन विचलित झाले वणवणते
क्षणभरात फुलते क्षण सरले
विरहात खुळे मन रणरणते



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# ध्यास

उरात आग वेगळी अशी उदास पेटते
मनात जाग जागते पहाट दूर दाटते
दिव्यास रात्र जाळते नभात मेघ गाजता
निवांत चांदणे खुले सभोवताल लाजता

कुठे अशीच भेटशी हळूच येऊनी मला
तिथेच वाट पाहतो निसर्ग हा मनातला
वनात गंध वाहतो मंद धुंद तारका
जलात रंग फेकतो नभात चंद्र पोरका

कशी तुझ्या मनातली अशांत ही नवोदिता
निनादते जनात ही अम्हातली नवी कथा
क्षणोक्षणी तुझे मला उगाच भास वाटती
मनोमनी तुझे तरी कशास ध्यास दाटती ?



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



## व्याकुळ

स्पर्श लाजले लोभस होऊन
मोहरलेल्या ऋतूगंधातून
बहरुन आले सूर प्रीतीचे
तुझे नि माझे नेत्रसोहळे

क्षणात झुरते, मनात उरते
वादळणारी आर्त विराणी
नजरेमधली कळी कोवळी
मिटते हळवी सांद्र पापणी

क्षितिजावरची चंद्रकोर ती
लाटांवरती नाचत होती
रात मातल्या काळोखातून
ज्योत मनाची तरळत होती

तुझ्या गुलाबी ओठांवरती
पाझरणारी नशा बिखरते
विरह वेदना उरी बोचते
व्याकुळ गाणे निवांत गाते



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# प्रेमशिल्प

तू पाहशील जेव्हा अगतिक दिवसांत
अचानक आलेल्या पावसासारखी तुझी आठवण
माझ्या निवांत गात्रांमधून वाहून जाताना
तेव्हां चिंबणारी जखम ओघळत राहील
माझ्या डोळ्यांच्या खिडकीतून

आपल्या अबोल नजरा निमूटपणे मिटत जातील
विरहाच्या अवकाशात बरसणाऱ्या
धुंवाधार प्रेमगीतांमधून
आणि रक्तगर्भ वेदनांचे आभाळ
भळभळत राहील
माझ्या उदासवाण्या काळजात

आता येथल्या अनाथ वाटांवर
उध्वस्त झालेली संध्याकाळ
बहरणार नाहीये पुन्हा
तुझ्या स्मृतींच्या सुखद शिडकाव्याने

कारण माझ्या मनातल्या लेण्यात
कोरलेलं तुझं प्रेमशिल्प
पुरतं विरघळून गेलंय
या कठोर जगातल्या वादळमायेत...



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



# गीत गहिवर

e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# सूर्यफुलांसम जगण्यासाठी

शब्द गोंदतो अम्ही नभावर
नक्षत्रांच्या राशीमधूनी
स्वप्नांमधले भाव पेरतो
आभाळावर विराजणारे

कधी बहरतो कधी विखुरतो
अंकुरलेले गीत गाऊनी
जळमटलेल्या आठवणीतून
पेटून ऊठते अमुचे जीवन

कणाकणातून गरजत असतो
भाव बावळा अबोध अमुचा
निसटून जाते बरेच काही
उरात उरल्या दु:खांपोटी

जगी अनामिक लोक फुकाचे
घोटून सारे जीवन घेती
जळणे आहे धर्म आमुचा
सूर्यफुलांसम जगण्यासाठी


e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# गहिवर

तहानलंय तळं
उजाड झालंय रान
हरवल्या वाटेचा
शोध घेतंय भान

गहिवरलाय शोक
दुरितांच्या साठी
जिवाभावाची नाती
सुखांच्या पाठी

शब्दफुलांच्या वेढ्यात
रंगत आलंय गीत
बहरण्याच्या नादात
सरले जीवन - संगीत

वेढलोय मी माणसांत
गढलेल्या जीवनात
तळमळते माया ही
अविरत गूढ क्षणात



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# निराधार

हंबरती गाई तुझ्या
वासरांच्या मायेपाठी
गावरान हरवलं
आभाळाच्या छायेसाठी

चाऱ्यासाठी अर्धपोटी
खुरपतो रानोमाळ
दिस गेला रात आली
हताशली संध्याकाळ

पोरांसाठी चतकोर
भाकरीची आस फोल
पाणी नाही दूरवर
डोळ्यांमधी आली ओल

हसू नाही आसू नाही
जगण्याचा तुला शाप
निराधार मातीसाठी
खपला रे मायबाप

**(एकता कल्चरल अकादमीतर्फे आयोजित राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेत उत्तेजनार्थ पुरस्कारप्राप्त कविता)**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# आभाळाचे देणे

करुणाकर तो कसा विहरतो
इवल्याशा त्या कणात जागत
निवांत फुलतो अंधारातून
गलबलणाऱ्या वाऱ्यासंगे

उनाड माती उजाड वाटा
फोलपणाचा नवा पिसारा
हळवा दिसतो उन्मेषाचा
हवेत झुलता मंद किनारा

संधिप्रकाशा बिलगून नाचत
बहरत जाई सांज आगळी
अनाथ वाणी शब्द लेवूनी
गर्भरेशमी रात मोकळी

वाजत गाजत लहरी संगे
वसे सुरांवर गीत देखणे
गर्जत बरसत मेघ सावळे
आभाळाचे लुटती देणे



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



# परी गोड तू

( एका चिमूकलीस पाहून)

सान चिमुकली परी गोड तू
हसते कोमल खळी होऊनी
जशी उमलते कळी अवेळी
स्वप्नकळ्यांचे पंख लेवुनी

तुझे दर्पणी रुप मनोहर
हळुच विलसत जाते सुंदर
नयनातील तव स्वप्नांसाठी
दिशांत झुरतो वेडा सागर

निवांत बसते अबोल होऊन
उगाच रुसते कधी जगावर
तुझ्या मनातील मुक्त भावना
कुणा न कळल्या कशा आजवर

बहरुन जाते तुझ्याच संगे
मोहरते गगनाचे अंगण
क्षणात गुंजन क्षणात गाणे
विरघळते हृदयातील स्पंदन



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# असे जिव्हाळे

दगडविटांच्या घरात माझ्या
फुलते गाणे आकाशाचे
आयुष्याच्या वाटेवरती
रोजच जगणे अस्तित्वाचे

अनंत आशा घेऊन छप्पर
कोसळते जर उदासवाणे
भिंतीमधल्या चिंता लेवून
ढासळते मन अशांत होऊन

नात्यांमधली दरी वीतभर
कधीच मिटली राखून अंतर
दारामागे उभी ठाकते
जगण्याची ही रीत निरंतर

कुंपणातले सृजनसोहळे
तृणपात्यांचे नवे उमाळे
कशास जाती दूर पाखरे
जिवास लावीत असे जिव्हाळे



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## गाणे चैतन्याचे

वितळून जाती दिवस भराभर
पळापळांच्या मरणापाठी
काळ थांबला कधी न क्षणभर
ओघळणाऱ्या अश्रूंसाठी

वेग धुंद हा मस्त कलंदर
जीवनातले भाव अनावर
सरसर झरते माणूसपण हे
निवांत सरणाच्या वाटेवर

चांदणवेली पसरून झोळी
रूप दावती नभी आगळे
क्षितिजावरच्या कातरवेळी
मनात झुरते गीत वेगळे

पसरत जाई दिशादिशांनी
अनवट गाणे चैतन्याचे
लाख दिव्यांतुन आनंदाच्या
तेज साजरे चराचरांचे



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# अनामिक

रुणुझूणू वाजे परिसर सारा
रातकिड्यांचा नाद किरकिरा
ताऱ्यासंगे चंद्रकोर ती
दरीत वाहे उनाड वारा

गुणगुण पक्षी, मनात नक्षी
थरथरणारी पाने सळसळ
नदीनाल्यांची वनात खळखळ
नभी दाटते उधाण वादळ

गूढ अनाहत काळोखाची
शाश्वत होती साथ निरंतर
अनवट वाटेवरती धावे
निरामयाची माया बेघर

दूर वाजते गोड बासरी
धून गाजते कडे कपारी
दरवळणाऱ्या फुलांत बहरून
गात राहिला कुणी अनामिक

**(पूर्व प्रसिद्धी - 'अनामिक' दिवाळी २०११)**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# अर्थगर्भ एकांती

नित नूतन रात नवी
गीत नवे गात कवी
अर्थगर्भ एकांती
चिन्मय तूज साथ हवी

हळवा क्षण गूज वनी
संथ नवल तेज तनी
घनघन कण देहातून
तरल विरल भाव मनी

गहिवरल्या भावातून
खुलते नव गीत मधुर
शांतवल्या सूरांतून
बहर नाद भानावर

मंद धुंद कल्पांती
अगतिकली विश्रांती
स्वप्नकळी खुलताना
जग फुलले प्राणांती



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# जागर नव्या युगाचा

नवल देखिले नवकवितेचे
नव्या दमाच्या तरुण कवींचे
नवकवी आले घेऊन दारी
नवी चेतना नवी भरारी

सरले मीपण उरलो आपण
नवक्रांतीचे नवबीज रोपण
नव नवलाई नव दिवसांची
अविरत फुलत्या शब्दकळांची

गहन विचारी शब्दांसाठी
भाव नवे नव प्रतिभा ओठी
चपखल भाषा नवीन आशा
गतिमानांच्या नवीन देशा

सकल जनांच्या उद्धाराची
नव्या जगाच्या नव गाथेची
नव्या मनांची किरणे कोमल
नवे तेज पाजळती निर्मल

हृदयी भिडते नवी भावना
नव प्राणातील नवी चेतना
नव मानव की अशांत सागर
नव्या युगाचा हा तर जागर



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## मरणास जिंकण्या आधी

दारात थबकली माझ्या घनघोर वादळे काळी
उधळले तेज गगनाचे विटलेल्या कातरवेळी

घन कोसळताना रुसले माझ्याच झोपडीवरती
खुलताना माझी गाणी दशदिशांत पक्षी गाती

दिनरात कसे विसरावे या पारावरचे झोके
तरुणाई झटकून देते क्षणभरांत सारे धोके

जगता हसता रडताना फसणारे दाहक डोळे
मायावी या दुनियेचे दिसणारे मोहक जाळे

त्या दूर डोंगरापाशी कुणी घेतो अमर समाधी
मरताना जीवन हरले मरणास जिंकण्या आधी



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



## लेक ती माझीच होती

कोवळी ती कोंब होती, पापणीतील थेंब होती
जन्मण्याआधीच गेली, लेक ती माझीच होती

याद येते रोज कन्या, तीच माझी राजकन्या
गर्भल्या पोटात होती, झोपलेली ती सुकन्या

का तिला जमलीच नाही, जन्मण्याची साधना ही
मूक निजली जन्मताना, बोलली ती शब्द नाही

आसवांचा पूर आला, उर तो दाटून गेला
आठवूनी रोज तिजला, सूर गाण्यातून गेला

आज असती भोवताली, लाडकी माझी नवेली
क्षणभराची सोबती पण, कोणत्या दुनियेत गेली



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## नादब्रम्ह

निवांत फुलतो दिवस नव्याने
काळाच्या पडद्यावर उमटून
नक्षत्रांच्या राशी घेऊन
रात येतसे श्रांत मनातून

सहज उमलता गाणे सुंदर
भ्रांत भावना घेत भरारी
सुगंधणाऱ्या शब्दांनाही
मधुमय गाती सूर सतारी

अनामिकाचे गीत मनोहर
जीवनातल्या झंकाराचे
संगीत न्यारे ताल तरुवर
स्वरमय होते संध्या कातर

किणकिण पैंजण जनांत घुमते
मनात भरते छान सुंदरी
सौंदर्याचा नाद गुंजतो
लयीत वाजे मधुर बासरी

थिरकत नाचे माळावरती
कलकलणारे उधाण वारे
नदीनाल्यांची अगाध खळखळ
वनात गाती रानपाखरे

जगी साजरा सण गाण्याचा
विराट उत्सव माधुर्याचा
ताल, सुरांचा संगम हा तर
सुखद सोहळा आनंदाचा



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## गीत माझे धुंद झाले

शब्द होते अर्थवाही
भावनांच्या संगतीने
गीत माझे धुंद झाले
जीवनाच्या या गतीने

मोहणारे सूर वेडे
रंगले रंगात माझे
धुंद झालेल्या क्षणांचा
सोहळा डोळ्यांत साजे

साजरा वर्षाव होता
जागलेल्या मैफलीचा
ताल साजे सोबतीला
गुंजणाऱ्या संगीताचा

मंद झाले तेज सारे
नादब्रम्हाच्या सकाळी
गुंतलेले भान होते
मोकळे आकाश भाळी



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## ताल - बेताल

गोठलेल्या सागराचे ते किनारे पेटलेले
माणसांच्या वेदनांचे सूर सारे आटलेले
वादळाच्या काळरात्री वेंधळा हुंकार होता
झोपलेल्या या जगाला तारकांनी वेढलले

तार ती झंकारलेली तान सुटता सूर वाजे
गीत अन संगीत न्यारे साथ देण्या ताल साजे
कालची ती धून वेडी सप्तकांनी साजलेली
ताल तो बेताल झाला रंगलेले ओठ माझे

मेनका, रंभा जणू त्या अप्सरेसम नाचणाऱ्या
झिंगणाऱ्या या महाली त्याच मदिरा पाजणऱ्या
का नसावे माणसांना भान आता या जगाचे
धुंदलेल्या या जीवांच्या सावल्याही धुंद साऱ्या

फेकती माला फुलांच्या पाकळ्या ते तोडिती
घाव सारे बोचणारे या उरी ते झेलिती
रात्र अंधारात निजता चांदणेही धुंदले
बंधने तोडून सारी मैफली या रंगती



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



## तुझ्याच रंगी

शांत वनातून गूंजत जाते
तुझी बासरी मधुर सूरांतून
भाव मनातील बरसत गाते
घन कोसळत्या आभाळातून

तुझ्याच रंगी रंगत जाते
मधुबन भक्तीच्या वाटेवर
नाचत गाते तुझीच गाणी
गवळण वेडी प्रेम दिवाणी

यमुनाकाठी विहरत होता
बालक तू रे नटखट तान्हा
गोप-गोपिका मुक्त जाहल्या
रासक्रीडेने तुझ्याच कान्हा

तुझे भावते रुप सावळे
कोमल हसरे कमळदलापरी
नभात जोवर सूर्य -चंद्र हे
तोवर राधा तुझी बावरी



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# अमूर्त छाया

अधीर जिवाला पोखरते मन
अलगद पेलत दु:खांनाही
हरवून सुख ते निवांत जळतो
अचेतनाचा वणवा देही

दरवळ कसला हा जगण्याचा
मरणाच्या दारावर विरतो
सरणावरची तिरडी झटकून
इथे अनामिक आत्मा सरतो


चितेत उज्ज्वल जीवन जळते
दाही दिशांना गंधित करुनी
हारफुलांची अगतिक चादर
संचित विरखुन जाते गगनी

गलबल अश्रू ओघळताना
जनामनातून गहिवर नुसते
रडणे केवळ भासच असतो
दिगंत होऊन मरणही मरते

सरते जीवन सरते माया
मातीमधूनी जिरते काया
दहीभाताच्या पिंडावरती
उभी भासते अमूर्त छाया



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



# अंकुर

मातीमधला अंकुर आता झडतो आहे
इथे पांगळा वृक्ष मनातून रडतो आहे

कणाकणातील जीवनगाणे विरून गेले
क्षणाक्षणाला मरण चहुकडे दिसू लागले

पाण्यासाठी वणवण करतो माणूस इथला
अमृत आहे एक जलाचा थेंब जीवाला

हिरव्या नक्षीवरचे पक्षी उदास झाले
नव्या जगाचे प्राण जीवांना सोडून गेले

कसे जगावे जगात जीव हे कुणा न कळते
जनावनातील चराचरांचे नशीब जळते

अजून आहे आशा जर ही जगण्यासाठी
नका मालवू दीप चिमुकल्या वातीसाठी


e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# कवितेच्या वाटेवर

भाषेच्या तप्त मुखातून
शब्दांचा फुटतो लाव्हा
बरसते आग जोशाची
कवी गातो कविता जेव्हा

दरवळे गंध प्रतिभेचा
फुलताना मोहक गाणी
रुजुवात नव्या जगण्याची
बहरते युगाची वाणी

हा उत्सव आनंदाचा
ना केवळ अक्षरमेळा
वेदना मनाच्या लिहितो
घन क्षितिजावरचा भोळा

कवितेच्या वाटेवरचे
आभास निराळे सगळे
शब्दांतून लिंपण होते
मायावी नवसृजनाचे

ही ओढ कशी कवितेची
प्रेमातूर सृजनासाठी
लयदार अशी झोकाने
विलसते कवींच्या ओठी

**(यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे आयोजित काव्यस्पर्धेत द्वितीय पुरस्कारप्राप्त कविता)**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## मैफल

या इथे मी थांबलेला क्षणभराचा एक यात्री
रंगलेल्या मैफलीच्या धुंद झाल्या गोड रात्री

वाट आहे गोठलेली माणसांच्या वेदनांनी
वादळाचे गीत गाती सूर ते घोटून कोणी

मंद झालेल्या या स्वरांना बोलके कोणी करावे ?
छेडली ही तार तरीही गीत प्यारे का सरावे ?

स्पंदने छातीतल्या भात्यात का ही गुंतवावी
या क्षणी वेडावणारी हीच गाणी कां म्हणावी ?

रंग ओले भावनांचे लोक ते झाले दिवाणे
भारलेल्या या महाली कोठुनी आले तराणे ?

साथ नाही पण तयांची गात आहे बासुरी
कोणत्या रागात विरली स्फुंदलेली वैखरी ?

चेतलेली वात विझली पेटलेल्या अंगणी
मूक झाले स्पर्श सारे वेड लावी रागिणी

ताल हे बेताल झाले झोकणारे डोलती
अंतरीच्या या स्वरांना छेडणारे सोबती

**(‘अक्षरधन’ त्रैमासिकाच्या राज्यस्तरीय काव्यस्पर्धेत पुरस्कार )**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# काजळमाया

लहरत होती रात्र वादळी
अंधाराला बिलगून काळी
देवघरातील समईखाली
हलू लागली दाट सावली

शांत मनातील भ्रांत भावना
झिरपत होती जुनी वेदना
दाही दिशा त्या व्याकुळलेल्या
नभांत शिरल्या काजळलेल्या

ज्योत जिवाची उरी पेटते
आर्त कुणाची हाक ऐकते
परमार्थाच्या वाटेवरती
अज्ञाताला साद घालते

मिटले डोळे चित्तही थिजले
पापण्यांतुनी वावरताना,
तन्मय झाली सारी गात्रे
निशिगंधातून सावरताना

हरपून गेली श्रांत कामना
निजली सारी प्रांजळ काया
जीवन झाले संध्याछाया
खुलू लागली काजळमाया

**(मैत्रेयी फाउंडेशनच्या राज्यस्तरीय काव्यस्पर्धेत पुरस्कार )**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## मोक्ष

थोर माजले लोक गांजले
रक्त कुणाचे इथे सांडले,
रांगेमधले दीन भिकारी
भीक मागणे सोडून रडले

चीड आणती गर्दीमधले
रंग फासूनी भक्त नाचले
माथ्यावरचे गंध पुसोनी
रोज पुरोहित भरकटलेले

जनावरांची जात कोठली
कुणी कशाला विचारलेली
गतकाळाची भुते गाडुनी
कशी माणसे पुढे चालली

झिजली काया झिजली हाडे
विरली माया निजले वाडे
नियतीच्या दारात गायले
सरणावरचे मरण पवाडे

राऊळातले दिवे पेटता
तनामनाचे पाप साठते
थिजल्या गात्री अशी निरंतर
मोक्षासाठी रात्र गोठते



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# कृष्ण बावळा

काजळरात्री उजळीत जाते
कृष्णसख्याचे प्रेम दिवाणे
रमते राधा गंधित होऊन
प्रेमसरींच्या वर्षावाने

मुग्ध वाजते गोड बासरी
यमुना काठी खुलती गाणी
दाही दिशांना फुलतो उत्सव
रंग विखरुनी विराट गगनी

सुंदर काळ्या काजळ नेत्री
हसतो कान्हा दिसता रमणी
आतूर गवळण गात नाचते
साजण वेडी गहिवर गाणी

गहन सावळा कृष्ण बावळा
घन माथ्यावर निळा बरसतो
सहज लाजरा निसर्ग हिरवा
चिंब वनातून सजून येतो



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## ऋतू

तुझ्या डोळ्यातला ऋतू
फुलू लागला मनात
घन ओथंबल्या राती
सुख दाटलं जीवात

चिंब जीवातले गाणे
सण उधाण साजरा
पिसं लागलं धरेला
कोसळती जलधारा

सांजवेळी थरारला
रानपाखरांचा थवा
पानापानात हासतो
साज हिरवा हिरवा

वेडी माया ही साजणी
तुझ्या माझ्या जीवनाची
कथा सांगते नभाला
हरपल्या भावनांची



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com




e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## बहर

ऋतू येती दिस जाती, गगनाच्या दिशांतरी
शेतामध्ये डोलणाऱ्या, पिकांवरी आल्या सरी

कोवळ्या त्या गवताच्या पात्यावर दव ओले
गंधणाऱ्या मातीतले नवे बीज अंकुरले

लगबग झाली किती रानवारा पिसाटला
सुखावला शेतकरी आभाळाचा रंग ओला

सांजवेळी गोठ्यामध्ये हंबरती गाई गुरे
घुंगरांच्या नादामध्ये नादावले गांव सारे

रानवाटा बहरल्या जाईजुईच्या फुलांनी
नक्षत्रांच्या राशीमध्ये चंद्र डोले आस्मानी

गीत गाते वनबाला बासरीच्या लयीवर
लोक सारे बहकले भान झाले अनावर

तळ्यामध्ये निळं पाणी विसावले पाणपक्षी
वाटेतल्या धुळीमध्ये शहारून आली नक्षी

रंगलेली घरेदारे दंग झाला आसमंत
बहरून आले वारे मनी फुलला वसंत

**(पूर्व प्रसिद्धी - 'दरवळ' दिवाळी २०११)**



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## पाउसगाणे

किती़क दिसांनी वने आज ही मोहक सुंदर दरवळणारी
ओल्या वाटेवरती सारी अलगद झाडे सळसळणारी

धुंद जगाशी असा खेळतो वारा अवखळ चराचरातुनी
हलते हळवे गूज वनांचे मंद स्वरांच्या लाटांमधुनी

गर्द निळ्या या नभात भिजले पावसातले झिम्मड गाणे
मेघ बोलती गरजत बरसत जलधारांच्या वर्षावाने

रानपाखरे जलात भिजली फडफडणारे पंख पसरुनी
इंद्रधनूची छटा मनोहर रंग उधळते क्षितिजावरुनी

गंध अनावर भरून आला पानफुलांचा सडा अंगणी
क्षणात येते उन सावली निवांत झाले तळ्यात पाणी

लाटांवरती दंग होऊनी उधाणलेला अशांत सागर
सारा परिसर झाला जलमय भिजून गेले हिरवे डोंगर

कोण खेळतो खेळ आगळे आनंदाचे असे सोहळे
अधीर मनाचे गूज सांगतो पाऊसगाणे गात वेगळे



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## दिनमान

वादळातल्या काजळरात्री, थरथरणाऱ्या पाऊलवाटा,
उसळून आले अंबर खाली, सरसरणाऱ्या सागरलाटा

निवांत जीवन, अशांत श्रावण, भिरभिरणारे भेसूर वारे,
तळ्यात पाणी, निळे जांभळे, खळखळणारे झरे नाचरे

घुसळत गेले भरभर वावर,पाचोळ्याला घेऊन साऱ्या,
रंग दाटले आभाळावर, इंद्रधनूचे लुकलुकणारे

पळापळांचे गीत गावया, मळभ निघाले आभाळावर,
तारकांसवे लुकलकणारी, दिशादिशांची नक्षी झालर

दिनमानाचे गणित मांडतो, सूर्य रोज हा नवा आंधळा,
युगायुगांच्या अनवट वाटा,रोज चालतो काळ बावळा



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

## सल फुलते ती

कमळाजवळी जल ते काळे
ओघळती क्षण भरभर कवळे
कळ तळ्यातली उरी जळजळते
नभ उदास होऊन कळवळते

सल फुलते ती वाऱ्यावरुनी
जल ढळते सलते तव नयनी
सळसळते यौवन हळहळते
फुलत्या कळीला घे सावरुनी

तिमिरातून सागर खळखळता
वन मोहरते मन तळमळता
नयनात कसे जीव पाघळती
दवबिंदू क्षणभर ओघळता

गदगदली पाने हलताना
घन परिमळ होऊन गळताना
त्या धूसर सांजेवर ढळती
कळवळते ओघळ जळताना



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# माया

काळ्या पाषाणातून इथल्या
नाद जगी या घुमतो आहे
जीवनगाणे गात हा झरा
डोंगरदरीतून फिरतो आहे

मंजुळ गाणी झुळझुळ पाणी
लक्ष जिवांची अमृतवाणी
वादळवारा बरसत धारा
रान गातसे रोज विराणी

शांत बहरते अलगद सारी
वसुंधरेची पावन सृष्टी
चराचरातून वेगवेगळी
जीवन सारे अगम्य दृष्टी

हरित वनांच्या जंजाळातून
पंख पसरूनी उडती वारे
आभाळाच्या छायेखाली
चमचम चांदण झडती तारे

वेध घेतसे अधीर मनाचे
वेड लावते मोहक छाया
दिवसामागे दिवस चालती
मोहरते जगण्याची माया



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# श्रावण सोहळा

तरुवर झुलते पानपाकळी
दवात खुलते सानुली कळी
भिरभिरणारी रानपाखरें
वनात फिरते अवखळ वारे

धुक्यात दडला डोंगरमाथा,
ढगात बिजली चमकत जाता
निसर्गातला पडघम वाजे
निर्झर गातो श्रावणगाथा

थिरकत पाने झाडांवरती
मस्त कलंदर गीत बरळती
दाट वनांच्या वेलींमधूनी
फुलपाखरे रंग उधळती

मेघ दाटले नभात साऱ्या
कोसळती या श्रावणधारा
चिंब जाहला परिसर सारा
अंधुक दिसतो सायंतारा

गुलमोहराने वाट सजवली
फुले सड्यातून लाल पसरली
दरवळणारा सुगंध सारा
मृद्गंधाने रात्र बहरली

उनसावली खेळ खेळुनी
उधाणवाटा दंग जाहल्या
क्षितिजावरल्या इंद्रधनूचे
वेड लाविले कुणी जगाला



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# झुलवा

कोसळतो घन कठोर काळा
रंग नभाचा खुळा आंधळा
काळोखातून काजळराती
गंध मातीचा उधळती सगळा

अनंग वारा तुडुंब धारा
दिशांत खुलती अंधारातून
बाळ मनातील गोजिरवाणे
गाणे गाई शब्दांवाचून

सुवास निर्मळ कळ्यांत कोमल
तळ्यात फुलतो साज मनोहर
सजण सावळा वाटेवरचा
कृष्ण बावळा हसे कुणावर

सजे फुलांतून खुलता झुलवा
खुले वनातील सुगंध पावन
हरित गारवा निवांत परिसर
मुक्या जीवांचे सुशांत जीवन



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com

# शब्द शब्द भिजताना

आतूरल्या अंगणात
दशदिशा ओघळती
शब्द शब्द भिजताना
गंधलेले गीत गाती

कृष्ण निळा बरसतो
बासरीच्या सूरावर
थेंब थेंब चिंबताना
वारा होई सैरभैर

रानेवने फुललेली
थुईथुई नाचे भुई
ऋतू होतो कासावीस
सूर्य येता माथ्यावर

पावलांची नक्षी ओली
सागराच्या तीरावर
पाखरांना जाग आली
नभ झाले गहिवर



e_circulation by e sahity pratishthan : www.esahity.com



रमेश सावंत

"गहिवरल्या भावांतून
खुलते नव गीत मधुर
शांतवल्या सूरांतून
बहर नाद भानावर "

अशा शब्दांतून 'गीत गहिवर', 'प्रेम गहिवर', 'श्रावण गहिवर', 'गझल गहिवर', 'मुक्त गहिवर' या पाच विभागांतील समृद्ध कवितांनी बहरलेल्या 'गहिवर' या पहिल्याच काव्यसंग्रहाच्या रुपानं मराठी काव्यविश्र्वात स्वतःच्या आगमनाचा पुकारा करणारा माझा विद्यार्थी रमेश सावंत हा नवोदित कवी असला तरी त्याच्या कविता प्रथितयश आहेत, हे लिहिताना मला खरोखर अतिशय आनंद होत आहे.

रमेश सावंत याच्या सर्व कवितांत त्याची जीवनानुभूती आणि कल्पनाशक्ती यांचा मेळ साधला गेल्यामुळे त्यांत एक प्रकारचा ताजेपणा व रसरशीतपणा आला आहे. स्वतःच्या आयुष्यातील अनुभव, सभोवतालच्या वास्तवातील भेदकता,उत्कट प्रणयभावना आणि निसर्ग सौंदर्य यांचा सुरेख मिलाफ झालेला हा त्याचा पहिलाच कवितासंग्रह लक्षणीय ठरला आहे.

कलियुगात हरवलेल्या पांडवांसाठी एक 'नवे महाभारत' घडवण्याची जिद्द त्याच्या ठायी आहे.त्याची ही आकांक्षा परिपूर्ण होऊन त्याची कविता मोरपिसाऱ्याप्रमाणे पूर्ण फुलून यावी अशा त्याला माझ्या हार्दिक शुभेच्छा ! या शुभेच्छाही त्याच्याच शब्दांत-

कृष्णकलेने झाकलेल्या सूर्याच्या साक्षीनं
चेतव आपलं तेज आणि वेध घे आजच्या कौरवांचा
चल, उचल तुझी लेखणी !

**बाळ राणे**

स्मित प्रकाशन